# सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,फलटण,जि.सातारा

# वार्षिक अहवाल

# २०२३ -२४

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | विभाग | विषय | पृ क्र |
|---|---|---|---|
| १ | | शुभेच्छा मा.संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र,सातारा . | |
| २ | | शुभेच्छा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| ३ | | मनोगत-प्राचार्य. | |
| ४ | | सातारा जिल्ह्याची माहिती | |
| ५ | शिक्षक शिक्षण | १ कोडींग प्रशिक्षण<br>२ शाळापूर्व तयारी अभियान<br>३ निपुण भारत अध्ययन स्तर व गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम | |
| ६ | सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास | १ गट साधन/समूह साधन केंद्र सक्षमीकरण<br>२ मुख्याध्यापक सक्षमीकरण<br>३ शिक्षण परीषद | |
| ७ | अभ्यासक्रम विकसन व मूल्यमापन | १ राज्य शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण SEAS-PARAKH<br>२. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन<br>३ HPC पायलट स्टडी<br>४ दीक्षा अंतर्गत शिक्षक क्षमता बांधणी<br>५ दीक्षा अंतर्गत आशय निर्मिती प्रशिक्षण<br>६ व्हिडीओ निर्मिती स्पर्धा<br>७ प्रश्ननिर्मिती व भाषा ,गणित पेटी प्रशिक्षण<br>८ दीक्षा पोर्टल विशेष शिक्षण online कोर्स पथदर्शी अभ्यास<br>९ ब्लेंडेड कोर्स PLC प्रशिक्षण<br>१० सेतू अभ्यासक्रम<br>११ राष्ट्रीय संपादणूक चाचणी ( NAS ) | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | संशोधन, क्षेत्रीय आंतरक्रिया ,समता विभाग | १  PRASHAST मोबाईल APP<br>२.समता सप्ताह<br>३ नवोपक्रम मार्गदर्शन व स्पर्धा<br>४  शाळा व्यवस्थापन समिती सभा<br>५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना  जिल्हा-सातारा | |
| ९ | विशेष उपक्रम | १ कला उत्सव<br>२ Band स्पर्धा<br>३. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत  महोत्सव<br>४ जिल्हा भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धा<br>५ क्षेत्र भेट | |

# वार्षिक अहवाल :२०२३-२४

**प्रवर्तक :**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,महाराष्ट्र शासन

**प्रेरणा :**

मा .रणजित सिंह देओल,

अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,महाराष्ट्र शासन

मा .सुरज मांढरे

आयुक्त (शिक्षण ),महाराष्ट्र शासन

मा. राहुल रेखावर,

संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,सातारा

**मार्गदर्शक**

श्रीम. याशनी नागराजन ,

मुख्य कार्यकारी अधिकारी,जि .प .सातारा

**संपादक व प्रकाशक**

डॉ.रामचंद्र कोरडे

प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,सातारा

**कार्यकारी संपादक**

श्री.कृष्णा फडतरे

अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख भाषा विभाग

**संपादन समिती**

डॉ. अमोल डोंबाले , वरिष्ठ अधिव्याख्याता

डॉ.विजय भिसे , वरिष्ठ अधिव्याख्याता

श्री.सतीश फरांदे ,अधिव्याख्याता

श्री.विजयकुमार कोकरे ,अधिव्याख्याता

श्रीम.विद्या कदम,अधिव्याख्याता

श्री.कृष्णा फडतरे, अधिव्याख्याता

श्रीम.अन्नपूर्णा माळी ,अधिव्याख्याता

**सहकार्य :**

श्री.बबन कोलप, लघुलेखक

श्रीम. आशा घनवट,ग्रंथपाल

श्री. प्रशांत सावंत ,कनिष्ठ लिपिक

श्री.सुनील शेंडगे , जिल्हा समन्वयक, समावेशित शिक्षण

श्री. गणेश जाधव, विशेष साधनव्यक्ती

श्री.वैभव शिरतोडे,शिपाई

सर्व कर्मचारी व अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,फलटण.सातारा.

# कार्यरत अधिकारी व कर्मचारी पदांचा तपशील

| अ क्र | अधिकारी व कर्मचारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ.रामचंद्र कोरडे | प्राचार्य ,गट अ ,उच्च श्रेणी |
| २ | डॉ. अमोल डोंबाळे | वरिष्ठ अधिव्याख्याता ,गट अ |
| ३ | डॉ .विजय भिसे | वरिष्ठ अधिव्याख्याता ,गट अ |
| ४ | डॉ .सतीश फरांदे | वरिष्ठ अधिव्याख्याता ,गट अ |
| ५ | श्री.विजयकुमार कोकरे | वरिष्ठ अधिव्याख्याता ,गट अ |
| ६ | श्रीम.विद्या कदम | अधिव्याख्याता ,गट ब |
| ७ | श्री.कृष्णा फडतरे | अधिव्याख्याता ,गट ब |
| ८ | श्रीम.अन्नपूर्णा माळी | अधिव्याख्याता ,गट ब |
| ९ | श्री.बबन कोलप | लघुलेखक |
| १० | श्रीम. आशा घनवट | ग्रंथपाल |
| ११ | श्री. प्रशांत सावंत | कनिष्ठ लिपिक |
| १२ | श्री.सुनील शेंडगे | जिल्हा समन्वयक, समावेशित शि. |
| १३ | श्री. गणेश जाधव, | विशेष साधनव्यक्ती |
| १४ | श्री.वैभव शिरतोडे, | सेवक |

# समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत पदे

| अ क्र | पदे | संख्या |
|---|---|---|
| १ | विषय साधन व्यक्ती | ११३ |
| २ | समावेशित शिक्षण जिल्हा समन्वयक | २ |
| ३ | समावेशित साधन व्यक्ती | ४० |
| ४ | विशेष शिक्षक | ९८ |

## शुभेच्छा संदेश



**मा. संचालक, SCERT ,सातारा .**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण, जिल्हा सातारा मार्फत प्रकाशित करण्यात करण्यात येणाऱ्या वार्षिक अंकात या संस्थेमार्फत सन २०२३ -२४ या कालावधीत राबविण्यात आलेले उपक्रम, कार्यक्रम व प्रशिक्षणाची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. सदर संस्थेमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , सातारा . मार्फत मार्गदर्शित उपक्रम उपरोक्त कालावधीत प्रभावीपणे राबविले गेले . विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी शाळा प्रवेश अभियान, अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन, क्षमता संवर्धन प्रशिक्षण, आनंदी बालशिक्षण , निपुण गुणवत्ता स्तर निश्चिती कार्यक्रम, मुखाध्यापक सक्षमीकरणासाठी विकसन कार्यशाळा, इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण,तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षण यासारख्या उपक्रम व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम- २००९ अनुसार शिक्षण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या विद्यार्थी यांच्या गुणवत्ता विकासासाठी साहित्य पेटी प्रशिक्षण, प्रश्ननिर्मिती प्रशिक्षण, सुरक्षिततेसाठी बालकांचे हक्क व सुरक्षितता कार्यशाळा , शिक्षण परिषद, शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण घेण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षणात सातारा जिल्ह्याची संपादणूक वाढविण्यासाठी संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या उपक्रम व कार्यक्रमाचा नक्कीच उपयोग होऊ शकतो. पुढील वर्षासाठी असेच विद्यार्थी नोंदणी ,टिकवणूक व गुणवत्ता वाढीसाठी व अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजनास व अंमलबजावणीसाठी हार्दिक शुभेच्छा !

**मा. राहुल रेखावर,भा.प्र.से**
**संचालक,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण**
**परिषद,सातारा .**

# शुभेच्छा संदेश



**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प .सातारा**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण, जिल्हा सातारा मार्फत विविध शैक्षणिक उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम उत्तमपणे राबविले जात आहेत. मुलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्राच्या क्षेत्रात करत असलेले उत्कृष्ट कार्य या पुस्तिकेतून दिसून येते. प्रत्येक विद्यार्थ्याने या मूलभूत क्षेत्रांमध्ये चांगली कौशल्ये विकसित केली पाहिजेत यासाठी जिल्हा परिषद सोबत राबवलेले उपक्रम व कार्यक्रम विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त आहेत.

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन, क्षमता संवर्धन प्रशिक्षण, आनंदी बालशिक्षण, निपुण गुणवत्ता स्तर निश्चिती कार्यक्रम, मुखाध्यापक सक्षमीकरणासाठी विकसन कार्यशाळा, इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण,तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षण, साहित्य पेटी प्रशिक्षण, प्रश्ननिर्मिती कार्यशाळा  यासारख्या उपक्रम व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. आपले सर्व विद्यार्थी पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रात निपुण आहेत हे सुनिश्चित करण्याच्या दिशेने उत्कृष्ट काम करणे आवश्यक आहे.

तुम्हाला गुणवत्ता विकासासाठी व उत्कृष्ट कार्यासाठी खूप शुभेच्छा..

**मा. याशनी नागराजन,(भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी( CEO)**
**जिल्हा परिषद,सातारा .**

# प्रस्तावना

आज जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण, जिल्हा- सातारा चा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना प्राचार्य या नात्याने मला विशेष आनंद होत आहे. शालेय शिक्षण हे स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर आहे. विद्यार्थी गुणवत्तेच्या दिशेने यशस्वी वाटचाल करित आहे. त्यातून अनेक सकारात्मक बदल घडून येत आहेत. नविन शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीतून एक नव्या वाटचालीला सुरुवात होत आहे. यामुळे उद्याचे एक आशादायी चित्र समोर येत आहे. या साऱ्यांच्या केंद्रस्थानी नक्कीच विद्यार्थी हाच आहे. यातून उद्याचा सुजाण ,सुसंस्कृत आणि समंजस विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक व्यक्ती कार्यरत आहे.यासाठी शासनाने पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे अभियान हाती घेतले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी शिक्षकांचा फार मोठा व मोलाचा वाटा आहे.

सातारा जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील मुलांना उत्तम दर्जाचे गुणवत्तापूर्ण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था हि जिल्ह्यातील गुणवत्ते संदर्भात कार्य करणारी शिखर प्रशिक्षण संस्था आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील गुणवत्तेसाठी जबाबदार असणारी ती एक प्रमुख शासकीय यंत्रणा आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संधोधन प्रशिक्षण परिषद,सातारा ,मीपा औरंगाबाद,समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद, सातारा. यांच्या सहकार्याने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत सातारा जिल्ह्यात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान,विद्यार्थ्यांचा गुणवत्ता पूर्ण व सर्वांगीण विकास यासाठी सन २०२३-२०२४ या वर्षात विद्यार्थी,शिक्षक ,मुख्याध्यपक व प्रशासकीय यंत्रणेसाठी अध्ययन स्तर निश्चित्ती विविध प्रशिक्षण कार्यक्रम, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निपुण स्तर निश्चिती कार्यक्रम,माता पालक मेळावे, इयत्ता पहिलीच्या शिक्षकांसाठी भाषा व गणित विषयासाठी आनंददायी शिक्षण,जिल्ह्यातील सर्व शिक्षकांपर्यंत भाषा व गणित साहित्य पेटी प्रशिक्षण यासारखे अनेक व विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.

विद्यार्थी घडविण्यामध्ये शिक्षकांचा फारमोठा मोलाचा वाटा असतो. या शिक्षकाला सक्षम करण्यासाठी त्याचे सातत्याने व्यावसायिक कौशल्यात सक्षमीकरण करणे आवश्यक असते. त्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे मार्फत शिक्षकांच्या व्यावसायिक सक्षमीकरणासाठी इयत्ता पहिलीच्या शिक्षकांसाठी भाषा व गणित विषयासाठी आनंददायी शिक्षण,शालेय गुणवत्ता वाढीसाठी इयत्ता पहिले ते आठवीच्या सर्व शिक्षकांचे अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षण, तसेच नववी ते बारावीच्या शिक्षकांचे क्षमता वृद्धी प्रशिक्षण, कृती संशोधन व नवोपक्रम कार्यशाळा, जिल्ह्यातील सर्व शिक्षकांपर्यंत भाषा व गणित

साहित्य पेटी प्रशिक्षण,बलरक्षक कार्यशाळा, शाळापूर्व तयारी प्रशिक्षण यासारखे अनेक उपक्रम घेण्यात आले.शिक्षण परिषदांच्या आयोजनातून नवीन राष्ट्रीय धोरण २०२० ,निपुण भारत अभियान, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कार्यक्रम, मुल निहाय नियोजन, PAT परीक्षा, SEAS सर्वेक्षण , शाळा पूर्व तयारी मेळावा कार्यक्रम इत्यादी बाबत सुलभन करण्यात आले.शैक्षणिक गुणवत्ता संदर्भातील कार्यक्रमाचे प्रभावीपणे राबवणूक करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात कार्य करणारी प्रशासकीय यंत्रणा सक्षम असणे आवश्यक असते. यासाठी या यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे मार्फत केंद्रप्रमुख,विषय साधन व्यक्ती व मुख्याध्यापकांसाठी PLC चे आयोजन करण्यात आले.

त्याचप्रमाणे बौद्धिक गुणवत्ते प्रमाणेच सर्वांगीण विकास होण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे मार्फत लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धा,कला उत्सव, बॅन्ड स्पर्धा,फिट इंडिया कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन यासारखे उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील कार्यरत सर्व अधिकारी,विषय साधन व्यक्ती यांचे मार्फत शाळा भेटी दरम्यान मुल भेट करण्यात आली. त्याचप्रमाणे शिक्षण प्रवाहातील नवीन विचार,ज्ञान ,माहिती व कौशल्य वृद्धीगत होण्यासाठी शिक्षकांना प्रोस्ताहन मिळावे म्हणून सदर क्षेत्र भेटी करण्यात आल्या. जिल्ह्याच्या गुणवत्ता विकासात यशामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,सातारा यांचे संचालक मा.राहुल रेखावर सर, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्रीम.याशनी नागराजन, शिक्षणाधिकारी प्रथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी सातारा जिल्हा परिषद, तसेच माझे सर्व सहकारी, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, सर्व साधन व्यक्ती,विशेष साधन व्यक्ती,विशेष शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी यांचा वाटा आहे.

प्रत्येक मुल शिकण्यासाठीचा हा प्रवास त्या मुलांमुळेच अर्थपूर्ण होत आहे. प्रत्येक शाळेतील आमचे शिक्षक या प्रवाहाचे शिलेदर आहेत.त्यांना शैक्षणिक साह्य करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,फलटण,जिल्हा-सातारा .सतत प्रयत्नशील आहे. गुणवत्तेच्या या अथक प्रवासासाठी सर्वाना शुभेच्छा!..

डॉ.रामचंद्र कोरडे
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
फलटण, जिल्हा-सातारा

# जिल्हा -सातारा




राष्ट्र राज्याच्या पश्चिम भागातील या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०,४८० चौ. किमी तर लोकसंख्या ३०,०३,९२२ (२०११) आहे.सातारा जिल्ह्याची राजधानी हे सातारा शहर आहे. शहराचे नाव शहराभोवती असलेल्या सात किल्ल्या (सात-तारा) पासून आहे . हे कृष्णा नदी व त्याच्या उपनदी, वेण्णा यांच्या संगमाजवळ स्थित आहे ।.सातारा जिल्हा पश्चिम महाराष्ट्रात येतो. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेस – सोलापूर जिल्हा,पश्चिमेस – रत्नागिरी जिल्हा, वायव्येस – रायगड जिल्हा ,उत्तरेस – सातारा जिल्हा व दक्षिणेस – सांगली जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर या शैक्षणिक विभागातील एक जिल्हा आहे.  सातारा जिल्ह्याला मोठी ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लाभली आहे . सातारा जिल्हा हा संत , महात्मे व थोर महापुरुषांचा जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. श्री समर्थ रामदास स्वामी ह्यांचा सज्जनगड, श्री गगनगिरी महाराज ह्यांचे जन्मस्थान पाटण हे देखील

साताऱ्यात आहे . सातारा जिल्ह्याने भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात व सामाजिक जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. आधुनिक भारतातसुद्धा सातारा जिल्ह्याने आपला वेगळा ठसा उमटवला आहे. ह्या जिल्ह्याच्या बहुतांश गावांमध्ये युवक भारतीय सेने मध्ये भरती होण्याची परंपरा जपतात. त्यामुळे शूरवीरांचा जिल्हा अशी ओळख ह्या जिल्ह्याने निर्माण केली आहे.

कऱ्हाड येथे कृष्णा-कोयना नद्यांचा संगम झाला आहे. या ठिकाणास प्रीतिसंगम म्हणले जाते. येथे कृष्णामाईचे मंदिर आहे. कऱ्हाडचे नाव यशवंतराव चव्हाण यांनी भारतात प्रसिद्ध केले. कऱ्हाडच्या (सातारा जिल्ह्याच्याही) शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा आहे. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र असणाऱ्या यशवंतरावांची केंद्रीय मंत्रिपदाची व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द गाजली, यशस्वी ठरली. ज्यांच्याकडे सांस्कृतिक जाण होती, विकासात्मक दूरदृष्टी होती अशा यशवंतराव चव्हाण यांची समाधी प्रीतिसंगमावर आहे.

फलटण येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले गेली अनेक वर्षे वास्तव्यास होते. आपल्या ओघवत्या वाणीने, वैशिष्ट्यपूर्ण अशा वक्तृत्वशैलीच्या माध्यमातून प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, श्रीरामकृष्ण परमहंस या व्यक्तिमत्त्वांचे एक निराळेच दर्शन महाराष्ट्राला घडवले होते.

ऑलिंपिकमध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून देणारे श्री. खाशाबा जाधव हे कऱ्हाड तालुक्यातील गोळेश्वर या गावचे होते. श्री. जाधव यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये कुस्ती या खेळात कांस्य पदक मिळविले होते. यांचे शालेय शिक्षण कऱ्हाडमध्ये झाले होते. ऑलिंपिकला जाण्यासाठी कऱ्हाडमधील लोकांनी त्यांना मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले होते.

महाबळेश्वर, पाचगणी , सज्जनगड , ठोसेघर  व कास पठार ही प्रेक्षणीय स्थळे सातारा जिल्ह्याची विशेष वैशिष्ठ्ये आहेत.

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण, जिल्हा सातारा

संस्थेमध्ये शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल २०१८ पासून खालील विभाग कार्यान्वयित आहेत

१ शिक्षक शिक्षण विभाग

इंग्रजी ,मराठी ,गणित ,उर्दू ,विज्ञान व सामाजिक शास्त्र विषय

२ सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास प्रशिक्षण विभाग ,व्यवसाय विषय शिक्षण ,व्यवसाय मार्गदर्शन ,मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग

३ संशोधन,क्षेत्रीय आंतर क्रीया ,समता विभाग

४ अभ्यासक्रम विकसन व मूल्यमापन,शैक्षणिक माहिती व तंत्रज्ञान ,संदर्भ साहित्य विकसन विभाग

**जिल्हा शिक्षण** व प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रामुख्याने खालील कार्ये केली जातात .

## कार्ये

१ जिल्ह्यातील १०० % मुलांची (CWSN)सह पटनोंदणी व उपस्थिती याकरिता शाळांमधून अध्ययनपूरक वातावरण निर्मिती करणे

२ राज्य प्रशिक्षण धोरणानुसार जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी गरजाभिमुख व मागणीनुसार प्रशिक्षण उपक्रमांची वार्षिक दिनदर्शिका विकसित करून प्रभावी अंमलबजावणी करणे .

३ विद्यार्थी संपादणूक चाचणी ,शासकीय व अशासकीय संस्थांनी केलेली सर्वेक्षणे यावरून जिल्ह्याची शैक्षणिक सद्यस्थिती विश्लेषण करून आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय कृती कार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करणे .

४ जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी विविध पातळ्यांवरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियमित नियोजन व आढावा बैठका घेऊन गुणवत्ता विषयक कामकाज आढावा ,मार्गदर्शन व सहाय्य करणे

५ शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी गट साधन केंद्र (BRC)समूह साधन केंद्र (CRC)  व शहर साधन केंद्र (URC)मधील मनुष्य बळांचे क्षमता संवर्धन व संनियंत्रण करणे

६ महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद,सातारा व प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांचेकडील निर्देशाप्रमाणे जिल्ह्यातील पूर्व प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी शिखर संस्था म्हणून निर्धारित केलेली व जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी आवश्यक कृती कार्यक्रम राबविणे व अनुषंगिक सर्व शैक्षणिक व प्रशासनिक कार्य करणे .

७ विविध शासकीय व अशासकीय संस्था (NGO)यांच्या सहकार्याने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन करणे .

८ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,  अंगणवाडी ताई,माता पालक गट सक्षमीकरण करणे .

***जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण, जिल्हा सातारा संस्थेमार्फत सन २०२३ -२४ या कालावधीत पुढीलप्रमाणे प्रशिक्षण व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.***

## १)कोडींग प्रशिक्षण

प्रस्तावना :

संगणक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे.मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संगणकाने प्रवेश केलेला आहे.संगणक शास्त्रामधील पायाभूत संकल्पना तसेच आधुनिक संकल्पना यांची शिक्षकांना ओळख करून देणे आवश्यक आहे.अध्ययन अध्यापन प्रक्रियेत संगणकाचा वापर वाढवून अध्ययन अध्यापन प्रक्रिया समृद्ध करणे आवश्यक आहे. यासाठी सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा परिषद सातारा आणि पाय जॅम फाउंडेशन यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सातारा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक तसेच विद्यार्थी यांचे साठी संगणकीय कौशल्यांवर आधारित कोर्स राबविण्याचे ठरवण्यात आले. माहे सप्टेंबर २०२३ मध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण जिल्हा-सातारा आणि पाय जॅम फाउंडेशन यांनी एकत्रित मिळून जिल्हा परिषद सातारा विभागातील शिक्षकांसाठी “मूलभूत संगणक आणि कोडिंग प्रशिक्षण” या संगणकीय अभ्यासक्रमावर आधारित कोर्सची निर्मिती केली. ऑक्टोबर २०२३ मध्ये प्रसारित केलेल्या नोंदणी फॉर्म च्या आधारे एकूण ६८० शिक्षकांनी सदर कोर्स साठी नाव नोंदणी केली त्यातील ५७० शिक्षकांना पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणासाठी निवडण्यात आले होते. सातारा जिल्ह्यातील काही डोंगराळ भाग पाहता शिक्षकांना ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण घेणे कठीण होते, तरीही संपूर्ण प्रशिक्षण पूर्ण करुन एकूण १४४ शिक्षकांनी या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पात्र ठरले आहेत. सोबतच निवडण्यात आलेल्या शिक्षकांचा शाळा भेटींदरम्यान

असेही निदर्शनात आले की प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या शाळेतील विद्यार्थी संगणकीय कौशल्यंद्वारे त्यांच्या दैनंदिन अभ्यासक्रमातील उपक्रम वर्गामध्ये राबवत आहेत आणि त्यात कुशल होत आहेत, यामध्ये मुख्यतः २१ व्या शतकातील कौशल्ये-जसे की, समस्या निवारण, गणितीय संकल्पना, बौध्दिक क्षमता आणि तंत्रज्ञानासोबत सांगड अशी कौशल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत आहेत.

**गरज:**

दैनंदिन जीवनात प्रत्येक प्रसंगात/घटनेत क्रम असतो. संगणकातील अल्गोरिदम,सिक्वेन्सिंग यासारख्या संकल्पना कळत नकळत रोज आपण अनुभवतो. मात्र ह्या संगणकातील संकल्पना आहेत,याची आपल्याला जाणीव नसते. दैनदिन जीवनातील घटना,प्रसंग,दैनदिन केले जाणारे काम,अध्ययन –अध्यापन या सर्व बाबी मध्ये संगणकातील संकल्पना दडलेल्या आहेत याची जाणीव शिक्षकांना करून देणे आवश्यक वाटते .दैनदिन अध्ययन अध्यापनामधून संगणक विषय सहजपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे गरजचे आहे. संगणक विषयाचा इतर विषयाशी समवाय साधनेबाबत शिक्षकांमध्ये क्षमता विकसित करणे महत्वाचे आहे

**उद्दिष्ट:**

- शिक्षकांमध्ये कोडींग च्या मदतीने २१ व्या शतकातील कौशल्ये विकसित करण्यासाठी संगणक विज्ञान, कोडींग ची मूलभूत तत्वे आणि कॉम्प्युटर सायन्स अध्यापन पद्धती विषयी जागरूकता निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सायन्स शिकवण्यास सक्षम होण्यासाठी मदत करणे.

## प्रशिक्षण स्वरूप :

- सदर कोर्स हा ब्लेंडेड स्वरूपाचा आहे. प्रशिक्षणाचे एकूण ४ मोड्यूल आहेत ,प्रशिक्षण कालावधी ४ महिने. कोर्सचा काही भाग व त्याचा सराव स्वतःच्या वेळेनुसार ऑनलाईन

प्लॅटफॉर्म firki वर पूर्ण करणे अपेक्षित प्रशिक्षणाचा काही भाग PLC द्वारे ऑनलाईन सत्रात घेण्यात येतो.

- **प्रशिक्षण module मध्ये समाविष्ट संकल्पना-**

  Design Thinking , ALGORITHMS, SEQUENCING, LOOPING, DEBUGGING, VARIABLES, CONDITIONALS

- **प्रशिक्षण पहिला टप्पा ऑक्टोंबर .२०२३ ते मार्च २०२४**
- **सहभागी शिक्षक संख्या : ५७०**

**कार्यवाही**

सदर प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत **ऑक्टोंबर .२०२३ ते मार्च २०२४** या कालावधीत ५ टप्प्यात घेण्यात आले.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Online PLC - कालावधी व उपस्थिती:**

| अ. क्र. | विषय | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | C3F उद्बोधन सत्र | ४७० |
| २ | PLC १ | ४२० |
| ३ | PLC २ | ३४३ |
| ४ | PLC ३ | २९६ |
| ५ | PLC ४ | ३१२ |

**फलनिष्पती :**

१. शिक्षकांना कॉम्पुटर सायन्स विषयी मूलभूत संकल्पना समजण्यास मदत होत आहे.

२. शिक्षकांना Block Based Coding च्या माध्यमातून शालेय अभ्यासक्रमात नवनवीन प्रकल्प

तयार करण्याच्या पद्धतीची माहिती होते आहे.

३. कॉम्प्युटर सायन्स शिक्षणपद्धतीचा माध्यमातून नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्य तयार करता येत आहे.

४. विद्यार्थ्यांमध्ये २१ व्या शतकातील कौशल्य निर्माण करण्यास मदत होत आहे.

५. १४४ शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संस्थेमार्फत गुणांकन करून घोषित करण्यात आले.

६. ४२ मॉडेल शिक्षकांची निवड करून घोषणा करण्यात आली. या शिक्षकांच्या शाळांना आठ संगणकाची लॅब संस्थेकडून भेट स्वरुपात देण्याचे घोषित करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरुपात जिल्ह्यातील जिल्हा परिषद पाल या शाळेला ८ संगणकाची लॅब तत्काळ देण्यात आली



सातारा : अनिता बाबर यांचा सत्कार करताना शिक्षण विभागातील मान्यवर.

## अनिता बाबर यांचा मॉडेल शिक्षिका सन्मान

कराड : पुढारी वृत्तसेवा

जिल्हा परिषद जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण, पायजाम फाउंडेशन व उज्जीवन स्मॉल बँक फायनान्स यांच्या संयुक्त विद्यमाने मूलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षण आयोजित केले होते. यामध्ये अनिता श्रीरंग बाबर यांनी उत्कृष्टपणे प्रशिक्षण पूर्ण करून टॉप ४२ शिक्षकांमध्ये आपले स्थान पटकावले.

या प्रशिक्षणासाठी प्रारंभी ५१० शिक्षकाने नोंदणी केली होती. त्यापैकी १४४ शिक्षकांना प्रमाणपत्र देण्यात आले तर मॉडेल शिक्षक म्हणून टॉप ४२ शिक्षकांची नावे घोषित करण्यात आली. यामध्ये बाबर यांचा समावेश आहे. पारितोषिक वितरण सोहळा नुकताच जिजामाता अध्यापक विद्यालय, सातारा येथे पार पडला. या उत्कृष्ट कामगिरी जि. प. प्राथमिक शाळा पाल, ता. कराड या शाळेत आठ संगणक असणारी लॅब प्राप्त झाली आहे. शाळेचा प्रत्येक विद्यार्थी संगणक ज्ञानात पारंगत असावा व शाळेची गुणवत्ता विकास व्हावा, यासाठी बाबर यांनी प्रयत्न केलेले आहेत.



पुढारी

www.pudhari.com

## प्राथमिक शाळेस आठ संगणकांची लॅब

### कोर्टी शाळेतील सविता जाधव टॉप मॉडेल शिक्षिका

उंब्रज : पुढारी वृत्तसेवा

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण व पाय जाम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मूलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल कोर्टी (ता. कराड) येथील प्राथमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती सविता अशोक जाधव यांनी टॉप मॉडेल शिक्षकांमध्ये सहावा क्रमांक पटकाविला आहे. तसेच शाळेसाठी आठ संगणकांची लॅब प्राप्त करून दिली आहे.

कोर्टी : सविता जाधव यांचा गौरव करताना मान्यवर.

मूलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सुमारे ५८० शिक्षकांची नोंदणी करण्यात आली होती. त्यामधील १४४ शिक्षकांनी हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. यातीलच ४२ शिक्षकांची मॉडेल शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये सविता जाधव यांनी टॉप मॉडेल शिक्षकांमध्ये सहावा क्रमांक पटकाविला आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. जिजामाता अध्यापक विद्यालय सातारा येथे प्रमाणपत्र वितरण समारंभासाठी डायटचे प्राचार्य रामचंद्र कोरडे, कृष्णा फडतरे, विद्या कदम, विश्रांती कदम तसेच पाय जाम फाऊंडेशनच्या प्रांजली पाठक, आदेश, महेश, अन्नपूर्णा माळी, सुनिल शेडगे, वैभव भगत, योगेश गुर्धालकर, गणेश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. सविता जाधव यांचे गटशिक्षणाधिकारी सन्मती देशमाने, विस्तार अधिकारी नितीन जगताप, केंद्रप्रमुख मधुकर सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांसह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

शुभम उंब्रज
DOLBY DIGITAL
AC CINEMA
रोज १२, ३ व ९ वा.
मडगाव एक्सप्रेस
MADGAON EXPRESS
तिकिट दर : बाल्कनी : १०० रु. स्टॉल: ७० रु.

My Satara Edition
Apr 10, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

सकाळ

# संगणक लॅबचे ४२ शिक्षकांना वितरण



सातारा : संगणक लॅबचे वितरण करताना मान्यवर.

सातारा, ता. ३० : पाय जाम फाउंडेशन व उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक यांच्या वतीने ४२ शिक्षकांना संगणक लॅबचे वितरण करण्यात आले.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था फलटण, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक व पाय जाम फाउंडेशन यांच्या संयुक्त वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. रामचंद्र कोरडे, अधिव्याख्याता कृष्णा फडतरे, विजयकुमार कोकरे, विद्या कदम, अन्नपूर्णा माळी, समन्वयक सुनील शेडगे, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे वैभव भगत, विभागीय व्यवस्थापक योगेश गुर्धालकर, गणेश मोरे, विश्रांती कदम, पाय जाम फाउंडेशनचे प्रांजली पाठक, प्रकल्प अधिकारी, महेश तोत्रे, आदेश नांदवीकर, जयेश माळी, अक्रम मणेर आदींची उपस्थिती होती. अनिता बाबर यांनी सूत्रसंचालन केले.

या उपक्रमात जिल्ह्यातील ६०७ शिक्षकांनी नोंदणी केली होती. त्यातील १४४ जणांना प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. त्यापैकी ४२ शिक्षकांची संगणक लॅबसाठी निवड करण्यात आली. या शिक्षकांच्या शाळांना आठ संगणकाची लॅब संस्थेकडून भेट देण्यात आली. या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात शेळकेवाडी या शाळेला आठ संगणकाची लॅब देण्यात आली.

Satara, Satara-Today
31/03/2024 Page No. 3







## 2. शाळापूर्व तयारी अभियान

❖ **शाळा पूर्वतयारी अभियान उपक्रमाची उद्दिष्टे :**

विद्यार्थी देशाचे भवितव्य आणि संपत्ती आहेत,त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही आपली सामुहीक जबाबदारी आहे.विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सुरुवातीला म्हणजे पूर्व प्राथमिक शिक्षणावर जास्त भर देणे आवश्यक आहे,जर पाया भक्कम असेल तर इमारत मजबूत तयार होते,म्हणूनच राज्यामध्ये तसेच सातारा जिल्ह्यातही शाळापूर्व तयारीवर जास्त फोकस करण्यात आला.त्यासाठी शाळापूर्व तयारी अभियान राबविण्यात आले. शाळापूर्व अभियान हे जून २०२३ मध्ये इयत्ता १ लीला दाखलपात्र होणाऱ्या मुलांसाठी पालकांच्या मदतीने घेण्यात आले. सदर शाळा पूर्वतयारी अभियान उपक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१) इयत्ता पहिलीला दाखल पात्र बालकांची पालकांच्या मदतीने शाळापूर्व तयारी करणे.

२) बालकांच्या शाळापूर्व तयारीसाठी पूरक शैक्षणिक सामुग्री उपलब्ध करून देणे.

३) बालकांच्या शाळापूर्व तयारी करिता स्वयंसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचे मार्फत माता पालकांना सहाय्य करणे

४) रिपोर्ट कार्डच्या आधारे बालकांच्या शाळापूर्व तयारीची पडताळणी करणे.

**दिनांक व कालावधी:** मे, २०२३

**आयोजनाचे ठिकाण:** तालुका स्तर - सातारा व सातारा मधील सर्व केंद्र शाळा (एकूण २४)

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: SCERTM, सातारा व प्रथम फौंडेशन

**एकूण खर्च: प्रती केंद्र २००० (४८०००/- रुपये)**

**सहभागी केंद्र संख्या: २४**

**सहभागी शिक्षक संख्या:** तालुका स्तर : ४८, केंद्र स्तर: सर्व शिक्षक

**उद्दिष्ट:** १. इयत्ता पहिलीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे सर्वांगीण मुल्यांकन करणे.

२. इयत्ता पहिलीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता केलेल्या मुल्यांकनावर आधारित सुट्टीच्या कालावधीमध्ये विविध कृती देणे. (पालकांद्वारे व्हिडीओसह करावयाच्या कृती)

३. पहिलीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी तयार करणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** विकास पत्र, आयडिया व्हिडीओ

**अपेक्षित निष्पत्ती: १.** विद्यार्थ्यांची साक्षरता व संख्याज्ञान करिता पूर्वतयारी झाली.
२. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, सामाजिक, मानसिक मुल्यांकन व तपासणीमुळे विद्यार्थ्यांची सद्यस्थिती शिक्षकांना माहित झाली.
३. मुलनिहाय नियोजन करण्यास मदत झाली.

❖ **उपक्रम कार्यवाहीचे स्वरूप:-**

शाळापूर्व तयारी अभियान हे इयत्ता १ ली ला दाखलपात्र होणाऱ्या बालकांसाठी एप्रिल,मे व जून मधील सुरुवातीचे २ आठवडे शाळापूर्व तयारी अभियान राबविण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत (जिल्हा परिषद,नगरपालिका ) शाळा स्तरावरील मेळावा क्र.१ चे आयोजन दि. ११ ते २० एप्रिल २०२३ या कालावधीत करण्यात आले आहे. त्यापूर्वी राज्यस्तरावर शाळापूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत क्से घयवे यासाठी प्रशिक्षण घेण्यात आले. त्यांनतर विभागस्तरावर प्रःसिख्न घेण्यात आले सदर प्रशिक्षणासाठी प्रत्येक तालुक्यातून २ प्रशिक्षणार्थी बोलविण्यात आलेले होते सातारा जिल्हातून ४० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.तालुकास्तरावरही प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.तालुका/शहर साधनकेंद्र व तालुक्यातील प्रत्येक केंद्रावर प्रशिक्षण घेऊन मेळाव्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुकास्तरावर प्रशिक्षणासाठी प्रत्येक केंद्रातून २ प्रशिक्षणार्थी याप्रमणे ७७० प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनतर सातारा जिल्ह्यातील केंद्रस्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले सदर केंद्रस्तरीय प्रशिक्षणासाठी केंद्रातील जिल्हा परिषद, नगरपालिका शाळेतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक तसेच अंगणवाडी सेविका यांना बोलविण्यात आले होते.

- सदर केंद्रस्तरीय प्रशिक्षणात जिल्हा परिषद,नगरपालिका शाळेतील सर्व मुख्याध्यापक इयत्ता १ली ते ५वी चे सर्व शिक्षक, बालवाडी शिक्षिका,अंगणवाडी सेविका/ताई यांना सहभागी करुन घेण्यात आले होते. स्वयंसेवकामध्ये माजी विद्यार्थी, सामाजिक

कार्यकर्ता, इ.६वी ते ८वी चे विद्यार्थी, परिसरातील नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक, अंगणवाडी सेविका, बालवाडी शिक्षक/ सेवक, शिक्षक मुख्याध्यापक यांचा सहभाग घेण्यात आला.या शाळापूर्व तयारी अभियान मेळाव्याचे आयोजन पटनोंदणी अभियानाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले गेले.

- या अभियानात मुलांचे पालक,अंगणवाडी,शाळा आणि स्वयंसेवक, लोकप्रतिनिधी,अधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक व शाळेतील सर्व घटकांची मुख्य भूमिका ठरली गेली.
- *टप्पा क्रमांक ०१. - शाळापूर्व तयारी अभियान मेळाव्याची पूर्वतयारी - इयत्ता १ली मध्ये दाखल होणारी मुले व त्यांच्या पालकांची नोंद करण्यात आली.*
- *टप्पा क्रमांक ०२. - शाळास्तरावर शाळापूर्व तयारीचा पहिला मेळावा प्रत्यक्ष नियोजन व कार्यवाही करण्यात आली.*

  पहिला मेळावा शाळास्तरावर अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. यामध्ये शाळा अगदी सणाप्रमाणे पताका लावून सजविण्यात आल्या होत्या. प्रथमच शिक्षक व समाज यांनी इतक्या मोठ्याप्रमाणावर बालकांच्या स्वागतासाठी एक चळवळ उभारली. गावागावात बैलगाडी, tractor वर प्रवेशपात्र बालकांची मिरवणूक काढण्यात आली. त्यांना वाजतगाजत शाळेपर्यंत आणण्यात आले. मेळाव्यात ७ stall मांडण्यात आले. विकासपत्रकाच्या सहायाने त्यांची शैक्षणिक प्रगती पाहण्यात आली. त्यानुसार त्यांना पुढील ८ ते १० आठवड्यात करावयाच्या कृती सरावासाठी देण्यात आल्या. मेळाव्यात बालकांना विविध कृती व खेळ देण्यात आल्या.बालकांना खाऊ वाटप करण्यात आले.
- टप्पा क्रमांक ०३- शाळापूर्व तयारी मेळाव्यात येणारे बालक व पालकांनी शाळापूर्व तयारीच्या कृती घरी तसेच गटात करण्यात आल्या.
- टप्पा क्रमांक ०४:- दुसरा शाळापूर्व तयारी मेळावा

दुसरे मूल्यमापन आणि शाळापूर्व तयारी मेळावा १० ते १२ आठवडे झाल्यानंतर दि.१५ जून २०२३ ला संपूर्ण जिल्हात पुन्हा एकदा दुसऱ्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. जून २०२३ मध्ये इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या या मुलांचे विशेष स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये १५ जून २०२३ रोजी दुसऱ्या मेळाव्याचे आयोजनामध्ये परिसरातील लोकप्रतिनिधींना बोलविण्यात आले व त्यांच्या हस्ते मुलांची प्रगती पाहून प्रमाणपत्र /विकासपत्र वितरण करण्यात आली. शाळापूर्व तयारी एखादया सणाप्रमाणे आनंदाने साजरी करण्यात आले.

- १५ जून २०२३ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेमध्ये बालकांचे स्वागत व शाळापूर्व तयारी मेळावा क्रमांक २ चे आयोजन करण्यात आले.
- मेळावा क्रमांक २ मध्ये जून २०२३ मध्ये इयत्ता १ ला दाखल पात्र होणारे विद्यार्थ्यांची जबाबदारी जून २०२३ मध्ये इ१ ली चा वर्ग घेणाऱ्या शिक्षकावर जबाबदारी निश्चित करण्यात आली.तसेच पहिलाला दाखल होणारी सर्व मुळे शाळेत प्रवेशित होत नाहीत तोपर्यंत शाळा प्रवेश सातत्याने चालू राहतील याध्दतीने नियोजन करण्यात आले.
- शाळापूर्व तयारी अभियांनतर्गत इयत्ता १लीच्या वर्गासाठी दाखलपत्र बालकांना प्रवेश देऊन त्यांची उपस्थित वाढवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा मुख्य उद्देश या शाळा पूर्व तयारी अभियानाचा आहे.

❖ **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) शाळापूर्व तयारी अभियान मेळाव्याचे आयोजन पटनोंदणी अभियानाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे ठरले.

२) इयत्ता पहिली प्रवेशपात्र १०० टक्के बालकांना शाळेच्या प्रवाहात आणण्याच्या मोहिमेला यश मिळाले

३) माता-पालकांचे गट तयार झाले,सर्वत्र शिक्षणाबद्दल विचार सुरु झाला ही लोक चळवळ तयार झाली.

४) घरामध्ये मुले ही आई,वडील,घरातील मोठे भाऊ,बहिण,सवंगडी,शेजारी यांच्या माध्यमातून आनंदाने शिकू लागली .

५) करोना कालावधीत सर्व बालके शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेली होती त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत झाली.

६) करोना कालावधीत झालेला Learning Loss भरून काढण्यासाठी या अभियानाची मदत झाली.

७) या अभियानाच्या माध्यमातून प्रथमच बालकांच्या भविष्यासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात समाज,पालक,शिक्षक इत्यादी घटक एकत्र येऊन एक चळवळ उभी राहिली.

## ३. निपुण भारत अध्ययन स्तर व  गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम

प्रस्तावना –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार प्राथमिक स्तरावर सन २०२६-२७ पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात प्राथमिक पातळीवर अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केले नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना  मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरीत एक राष्ट्रीय अभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे यासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरावरून प्रयत्न चालू आहेत. सदर अभियानात विद्यार्थी,पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वंकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी निपुण भारत अभियानाची सुरुवात देश पातळीवरून झालेली आहे. याच अभियानाचा भाग म्हणून निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

उद्दिष्टे–

**१) निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धी उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान बाबतचा स्तर निश्चत करणे.**

**२) निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धी उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या भाषिक कौशल्याचा विकास करणे.**

**३) निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धी उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या गणिती कौशल्याचा विकास करणे.**

**४) निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धी उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या शिकण्यासाठी गावातील पालक,शाळा व्यस्थापन समिती सदस्य ,माता-पालक गट तसेच गावातील सुशिक्षित स्वयंसेवक यांची मदत घेणे.**

कार्यपद्धती-

निपुण भारत गुणवत्ता /क्षमता वृद्धी कार्यक्रम राबविण्यात आला आहे दि.१९ डिसेंबर २०२३ ते दि.११ फेब्रुवारी २०२३ या आठ आठवड्यांच्या कालावधीत सदर उपक्रमाची शालेय पातळीवर अंमलबजावणी करण्यात आली. भाषा व गणित विषयासाठी ८ आठवड्याचा दिवस निहाय कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता.इ. २ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यांची शिक्षकांनी ३ स्तरात विभागणी करून हा उपक्रम शालेय पातळीवरतीशाळांमध्ये यशस्वीपणे राबविलेला आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता
संपादणूकीची पडताळणी करण्यासाठी दि.२२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत शाळास्तरावर विद्यार्थ्यांचे संपादणूक सर्वेक्षण घेण्यात आलेले आहे.जिल्हा परिषद शाळांमधील इ.२ री ते ५ वीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सर्वेक्षणात समावेश करण्यात आला होता. शाळेमधील मुलांचे भाषा व गणित विषयाचे ३ स्तरामधील सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर शिक्षकांच्या मदतीने शाळेत झालेल्या विद्यार्थी सर्वेक्षणाची माहिती प्रपत्रात भरलेली आहे.यामध्ये एकूण ३६३६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांपैकी ३४७६ शाळाची माहिती प्रपत्रात नोंदवली गेल्याचे दिसून आले आहे. माहिती विश्लेषणात **जिल्ह्याची एकूण संपादणुकीमध्ये सरासरी ८% वाढ झाल्याचे दिसून येते आहे.**

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थ्यांच्या संपादणूकीबाबत प्राप्त झालेल्या **डेटा विश्लेषणातून खालील काही बाबी प्रामुख्याने दिसून आल्या.**

१. **सर्वाधिक गुणवत्ता वाढ झालेल्या शाळा:**

१००% उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या शाळांमधून किमान सरासरी ५१%ते १०० %पर्यंत मुलांच्या गुवणत्तेमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. जिल्ह्यात जवळपास ७१ शाळा या प्रकारात असल्याचे दिसून आले आहे.

**२. अल्प प्रमाणात गुणवत्ता वाढ झालेल्या शाळा :**

कमी अधिक प्रमाणात वर्गांमध्ये उपक्रमांची अंमलबजावणी प्रक्रिया घडवून आणणाऱ्या शाळांमध्ये किमान १% ते ५० टक्के पर्यंतच्या मुलांच्या गुणवत्तेमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात जवळपास १९४१ शाळा याप्रकारात असल्याचे दिसून आले आहे.

**३. गुणवत्तेमध्ये कोणत्याच प्रकारची वाढ न झालेल्या शाळा (शून्य टक्के गुणवत्ता वाढ) :**

वर्गांमध्ये उपक्रम राबवण्याच्या प्रक्रियेमध्ये सर्वात मागे राहिलेल्या शाळा यामध्ये विद्यार्थ्यांची पूर्व संपादणूक व उत्तर संपादणूक यामध्ये बदल झालेला दिसून येत नाही.कोणत्याही प्रकारची गुणवत्ता वाढ स्तर १, स्तर २, स्तर ३ या मध्ये दिसून येत नाही.यामध्ये स्तर १ मध्ये असलेल्या मुलांची संख्या उपक्रमा नंतर बदल झालेली दिसून येत नाही.

**४. पूर्व चाचणी पेक्षा उत्तर चाचणी मधील संपादणूक कमी झालेल्या शाळा-**


काही शाळांमध्ये Besline पेक्षाही Endline मधील गुणवत्ता कमी असल्याचे दिसून आले. म्हणजे गुणवत्ता मायनस (-) झाल्याचे दिसून आले. जिल्ह्यात जवळपास २६३ शाळांमध्ये गुणवत्ता मायनसं झाल्याचे दिसून येत आहे.(सोबत शाळांची यादी जोडलेली आहे.)


## फलनिषपत्ती –

निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम ८ आठवडे राबविल्यानंतर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (इयत्ता १ ली ते ५ वी) मधील विद्यार्थ्यांच्या एकूण संपादणुकीमध्ये सरासरी ८% वाढ झाल्याचे दिसून येते आहे.

इयत्ता- पहिली

| अ.क्र. | तालुका | भाषा साक्षरता | | संख्या साक्षरता | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अपेक्षित अक्षर गटातील सर्व अक्षरे वाचणाऱ्या व लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | अपेक्षित अक्षर गटातील २ ते ३ अक्षरे असलेल्या साध्या शब्दांचे वाचन व लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | २० पर्यंतच्या संख्यांचे वाचन,लेखन करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ५० पर्यंतच्या संख्यांचे वाचन ,लेखन व साधी बेरीज करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ९९ पर्यंतच्या संख्यांचे वाचन लेखन, साधी बेरीज व वजाबाकी करता येणाऱ्या विध्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण |
| १ | वाई | ८१.०० | ७३.०० | ७५.०० | ७०.०० | ६६.०० |
| २ | खंडाळा | ८५.१५ | ८१.८५ | ८०.१४ | ७२.१५ | ४३.९३ |
| ३ | फलटण | ८६.३८ | ७७.९५ | ७१.८२ | ६३.४७ | ५९.१९ |
| ४ | माण | ७७.२२ | ७०.८२ | ७४.०५ | ६३.२४ | ५९.६१ |
| ५ | खटाव | ८५.३० | ७८.९४ | ८१.०२ | ७६.१९ | ६५.०० |
| ६ | सातारा | ८२.२० | ७५.११ | ६७.६९ | ६४.१६ | ६३.१३ |
| ७ | कोरेगाव | ७७.०० | ६०.३४ | ७२.४७ | ३४.६८ | २०.०३ |
| ८ | कऱ्हाड | ७५.१८ | ६५.१८ | ७८.०२ | ६९.६८ | ६४.२९ |
| ९ | जावली | ८७.१५ | ८२.४९ | ८५.०७ | ७५.५६ | ५७.२१ |
| १० | महाबळेश्वर | ८०.२२ | ७७.२६ | ७७.०६ | ७६.३० | ७५.०४ |
| ११ | पाटण | ८३.६४ | ७०.९१ | ८३.६४ | ६८.२३ | ५४.१६ |
| सरासरी | | ८१.८६ | ७३.९९ | ७६.९१ | ६६.७० | ५७.०५ |





## इयत्ता- दुसरी

| अ.क्र. | तालुका | भाषा साक्षरता | | | संख्या साक्षरता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व अक्षरे वाचणाऱ्या व लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ४ ते ५ साधे शब्द असलेल्या वाक्यांचे वाचन व लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | अपठीत मजकूर असणारी वाक्ये एक ते दिड सेकंदात एक शब्द या गतीने वाचन करणाऱ्या व अपेक्षित गतीने लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | २०० पर्यंतच्या संख्यांचे वाचन,लेखन करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ५०० पर्यंतच्या संख्यांचे वाचन ,लेखन व साधी बेरीज करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ९९९ पर्यंतच्या संख्यांचे वाचन ,लेखन व साधी बेरीज आणि वजाबाकी करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण |
| १ | वाई | ८०.४० | ७५.०० | ६५.०० | ६९.०० | ६८.०० | ६३.०० |
| २ | खंडाळा | ८८.४९ | ८२.०४ | ७८.४० | ७९.६३ | ७६.५० | ७३.६१ |
| ३ | फलटण | ८९.३६ | ८४.११ | ७०.०५ | ७३.०३ | ६८.७५ | ६५.८६ |
| ४ | माण | ८२.०३ | ७०.१६ | ६८.६६ | ७३.३१ | ६४.५२ | ६१.९३ |
| ५ | खटाव | ८८.४४ | ८२.२२ | ७४.२८ | ७६.०१ | ७६.३५ | ७५.०६ |
| ६ | सातारा | ८६.८३ | ८२.३१ | ८१.२२ | ७०.१५ | ६८.४९ | ६४.६२ |
| ७ | कोरेगाव | ८३.३२ | ७०.३२ | ४८.९८ | ६२.६७ | ४३.६६ | ३२.३१ |
| ८ | कराड | ८६.८३ | ८२.३१ | ७३.२३ | ७०.१५ | ६८.४९ | ६३.४४ |
| ९ | जावली | ९६.६१ | ९३.१९ | ८२.३४ | ८३.५६ | ७५.५७ | ६३.३२ |
| १० | महाबळेश्वर | ८४.४२ | ८३.०५ | ८१.२८ | ८१.८४ | ८०.३८ | ७८.८० |
| ११ | पाटण | ८३.८२ | ७६.०२ | ६३.३६ | ७९.२७ | ७५.९१ | ६५.९१ |
| सरासरी | | ८६.४१ | ८०.०७ | ७१.५३ | ७४.४२ | ६९.६९ | ६४.३५ |

### दुसरी – भाषा साक्षरता






### दुसरी – संख्या साक्षरता



## इयत्ता-तिसरी

| अ.क्र. | तालुका | भाषा साक्षरता | | | संख्या साक्षरता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व अक्षरे व जोडाक्षरे युक्त शब्दांचे वाचन व श्रुतलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | सर्व अक्षरे व जोडाक्षरे युक्त शब्द असलेल्या वाक्यांचे वाचन व श्रुतलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | सर्व अक्षरे व जोडाक्षरे युक्त शब्द असणारा अपठीत मजकूर एका सेकंदात एक शब्द या गतीने वाचन व अपेक्षित गतीने श्रुतलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | २००० पर्यंतच्यासंख्यांचे वाचन,लेखन करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ५००० पर्यंतच्या संख्यांचे वाचन ,लेखन व साधी बेरीज आणि वजाबाकी करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | ९९९९ पर्यंतच्या संख्यांचे वाचन ,लेखन,साधी बेरीज, वजाबाकी व साधा गुणाकार करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण |
| १ | वाई | ७४.४० | ६९.२५ | ६२.२३ | ७१.४० | ७०.१२ | ६५.२५ |
| २ | खंडाळा | ८४.६५ | ८१.२५ | ७४.२६ | ८०.७९ | ७६.४८ | ७३.४९ |
| ३ | फलटण | ८०.४० | ७७.५० | ७१.४० | ७६.७४ | ७६.४७ | ७२.२७ |
| ४ | माण | ७५.७० | ७१.३५ | ६८.५४ | ७३.७० | ७०.०२ | ६८.४७ |
| ५ | खटाव | ७८.१० | ७६.०७ | ७०.२१ | ७६.१२ | ७३.४१ | ६८.१६ |
| ६ | सातारा | ७३.२५ | ७१.७७ | ६७.३९ | ७४.३० | ७२.०५ | ६९.४८ |
| ७ | कोरेगाव | ७२.७७ | ६०.५४ | ४७.९३ | ६८.३२ | ५१.८४ | ३९.०० |
| ८ | कराड | ७३.२५ | ७१.७७ | ६१.३९ | ७४.३० | ७२.०५ | ६८.०४ |
| ९ | जावली | ८९.०७ | ८४.९६ | ७६.७६ | ८०.०८ | ७८.६५ | ७२.४८ |
| १० | महाबळेश्वर | ८३.१४ | ८२.२६ | ८०.७५ | ८२.०६ | ८०.०९ | ७८.५३ |
| ११ | पाटण | ८३.९४ | ७९.६५ | ६६.६४ | ७९.०४ | ७८.६८ | ६१.५५ |
| सरासरी | | ७८.९७ | ७५.१२ | ६७.९५ | ७६.०८ | ७२.७१ | ६६.९७ |



# *सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास  विभाग*

(सातत्यपूर्ण विषय शिक्षण,व्यवसाय मार्गदर्शन,मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग)

या विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्य केली जातात .

१. शिक्षक व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक सक्षमीकरणासाठी सहाय्य करण्यासाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन व केंद्रस्तर शिक्षण परिषदांचे आयोजन करणे .

२. इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांची कलमापन चाचणी बाबत  मार्गदर्शन  व करिअर निवडीसाठी समुपदेशन करणे .

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास विभागांतर्गत सत्र २०२३  -२४ अंतर्गत खालील उपक्रम /कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .**

## १. गट साधन/समूह साधन केंद्र सक्षमीकरण

### प्रशिक्षणाची गरज :-

१) तालुकास्तरावर शाळा भेटी व पाठ निरीक्षण करत असताना ज्या बाबी आवश्यक आहे त्या कौशल्या मध्ये वाढ घडवून आणने आवश्यक होते.

२) गुणवत्तापूर्ण शिक्षण व दर्जेदार मुल भेट होण्या करिता शैक्षणिक व प्रशासनिक कामांच्या कार्यपद्धतीची जाण असणे आवश्यक आहे.

३) पर्यवेक्षीय यंत्रणेतील प्रत्येक घटक तसेच शाळा भेटी करिता इतर घटक यांचा योग्य तो समन्वय साधण्या करीता विविध कौशल्यांची जाण व कौशल्यांचे संक्रमण होण्याकरिता PLC (Professional Learning Community ) चे आयोजन होणे आवश्यक असते.

**प्रशिक्षणाची पार्श्वभूमी :-**

२३ नोव्हेंबर २०१७ पासून महारष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद व UNICEF यांच्या संयुक्त विद्यमाने KPALP हा प्रोग्राम संपूर्ण महाराष्ट्रातील २०१७ व १८ च्या संकलित चाचणीतील सर्वात कमी गुणवत्ता असणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यातील एका तालुक्यात सुरु करण्यात आला. यानुसार केंद्रप्रमुख म्हणून शैक्षणिक दृष्ट्या नेतृत्व करणाऱ्या घटकाकडे विशेष लक्ष देण्यात आले.मात्र पर्यवेक्षीय यंत्रणेतील प्रत्येक घटका बरोबर च गट/शहर साधन केन्द्र,समूह साधन केंद्रातील कार्यरत साधनव्यक्ती,केंद्रप्रमुख तसेच BRG/CRG मधील प्रत्येकी २ सदस्य यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे वाटत असल्याने मिपा छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने कौशल्यातील आवश्यक बाबींचे सर्वेक्षण करून सदर कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली .

**उद्दिष्टे :-**

१.शाळा भेट व मूल भेट या करिता आवश्यक असणारी माहिती/कौशल्य शासन निर्णय इत्यादीची माहिती करून देणे.

२.वर्ग भेट ,मूल भेट,पाठ निरीक्षण,नमुना पाठ नियोजन इत्यांदीची विस्तृत व कारणमिमांशासह माहिती देणे .

३.शालेय योजना,विविध परिपत्रके,अधिसूचना,शेरेबुकातील नोंदी,माहिती विश्लेषण आणि तंत्र,कृती  आराखडा या विषयीची माहिती देणे.

**कार्यवाही:-**

१) राज्य स्तरीय प्रशिण व मोड्युअल निर्मिती कार्यशाळेस  उपस्थित राहणे.

२) ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन,नियोजन व कार्यवाही करणे.

३) PLC चे आयोजन,नियोजन व कार्यवाही करणे.

४) प्रशिक्षणाचा अहवाल सादर करणे.

**फलनिष्पत्ती :-१.**शाळा भेट व मूल भेट या करिता आवश्यक असणारी माहिती/कौशल्य शासन निर्णय इत्यादीची माहिती झाली व उपयोजनांच्या पातळीवर जाऊन त्याचा वापर कसा होत आहे हे स्वाध्यायाद्वारे पहाता आले .

१) वर्ग भेट ,मूल भेट,पाठ निरीक्षण,नमुना पाठ नियोजन इत्यांदीची विस्तृत व कारणमिमांशा सहनियोजनाची सवय लागली.

२) शालेय योजना,विविध परिपत्रके,अधिसूचना,शेरे बुकातील नोंदी,माहिती विश्लेषण आणि तंत्र,कृतीआराखडा या विषयीची माहिती झाली व त्याप्रमाणे कामाकाजाच्या पद्धतीत  सकारात्मक बदल  झाले.

## २.STAR प्रकल्पाअंतर्गत मुख्याध्यापक सक्षमीकरण प्रशिक्षण

**पार्श्वभूमी:**

राज्यातील शालेय स्तरावर अध्ययन अध्यापन प्रक्रिया आणि अपेक्षित परिणाम यांचे बळकटीकरण करण्या संदर्भात जागतिक बँक अर्थसहीय्यीत STARS उपक्रमांतर्गत मिपा, औरंगाबाद यांच्यामार्फत मुख्याध्यापक सक्षमीकरण प्रशिक्षण माहे फेब्रुवारी २०२३ पासून सुरु करण्यात आलेले आहे. प्रशिक्षण गरजांचा अभ्यास, प्रशिक्षण घटक संच निर्मिती, राज्यस्तरीय प्रशिक्षण या सर्व बाबी मिपा, औरंगाबाद यांनी केलेल्या आहेत.

**गरज:**

शाळा प्रमुख म्हणून शाळेच्या गुणवत्ता व भौतिक  विकासात मुख्याध्यापकाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शैक्षणिक व प्रशासकीय बाबीची अद्ययावत माहिती मुख्याध्यापकांपर्यंत पोहचणे अत्यावश्यक आहे. तरच मुख्याध्यापक शाळास्तरावर मानवी व भौतिक संसाधनाचे योग्य पद्धतीने नियोजन करू शकतो. या सर्व बाबीसाठी मुख्याध्यापकांची दृष्टी विकसित होण्यासाठी प्रशिक्षण अत्यावश्यक आहे.

**कार्यवाही:**

मुख्याध्यापक प्रशिक्षणासाठी मा. संचालक, मिपा, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून सदर उपक्रमाची खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली.

- जिल्हास्तारवर प्रशिक्षणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमधील वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता यांची  नोडल अधिकारी तर प्रत्येक तालुक्यासाठी एक साधन व्यक्तींची तालुका नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली.
- जिल्हा  व तालुका नोडल अधिकारी यांचे माहे जून २०२३  मध्ये २ ते ४ जून २०२३  या कालावधीत राज्यस्तरावर प्रशिक्षण घेण्यात आले.

- मिपा, औरंगाबाद यांच्यामार्फत माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये प्रशिक्षणासाठी पात्र मुख्याध्यापकांची नोंदणी करण्यासाठी लिंक देण्यात आली.
- सातारा जिल्ह्यामधून १००२ पूर्ण वेळ पात्र मुख्याध्यापकानी प्रशिक्षणासाठी आपली नोंदणी लिंकद्वारे केली.
- माहे फेब्रुवारी २०२३ पासून पहिल्या टप्प्यात सातारा जिल्ह्यातील ७४९ मुख्याध्यापकांचे Online पद्धतीने इन्फोसिस स्प्रिगबोर्ड प्रणाली द्वारे प्रशिक्षण सुरु करण्यात आले.
- बारामती व खेड तालुक्यातील मुख्याध्यापकांचा समावेश प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात करण्यात आलेला नाही

## ३.शिक्षण परिषद

### प्रस्तावना

राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सर्वच स्तरावर यंत्रणा कार्यप्रेरित होऊन योग्य दिशेने १०० टक्के मुले शिकण्याच्या उद्देशाने काम करत आहेत. त्यासाठी राज्य, विभाग, जिल्हा व तालुका पातळीवरील शिक्षण परिषदा लाभदायी ठरत आहेत. त्याचप्रमाणे १०० टक्के शाळा, केंद्र, बीट प्रगत करण्यासाठी अवलंबित करण्यासाठी आलेल्या प्रक्रिया पध्दती, तंत्र व कौशल्य या बाबींचा सादरीकरणामध्ये समावेश असतो. त्याचा उपयोग शिक्षण परिषदेमध्ये उपस्थित असणा-या संबंधितांना होताना दिसून येतो.

### केंद्रस्तर शिक्षण परिषदेची गरज

राज्यातील सर्व समूह साधन केंद्रस्तरावर दरमहा शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात यावे असे मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन  व प्रशिक्षण परिषदे द्वारे पत्र निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण केंद्र शाळाबाह्य मूल विरहीत करण्यासाठीचे नियोजन व उपाययोजना, १०० टक्के मुलांची नियमित उपस्थिती, वाचन कार्यक्रम, स्वच्छता प्रक्रिया अहवालातील दर्शके इ. बाबींचाही त्यामध्ये समावेश करावा. तसेच केंद्रांतर्गत सर्व शाळा १०० टक्के प्रगत करण्यासाठीची चर्चा, नियोजन व कृती आराखडा या शिक्षण परिषदांच्या माध्यमातून तयार करून त्याप्रमाणे प्रत्यक्ष उद्दिष्ट प्राप्ती करण्यासाठी अंमलबजावणी करण्यात यावी असे निर्देश देण्यात आलेले होते; त्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शिक्षण परिषदेचे आयोजन उत्कृष्ट पध्दतीने केले जात आहे. याचा उपयोग आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक मुलाची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची वाटचाल सुकर होण्यास मदत होत आहे.

# केंद्रस्तर शिक्षण परिषदेची पार्श्वभूमी

भारत सरकारच्या National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy (NIPUN BHARAT) अंतर्गत "मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान" ची अंमलबजावणी करणेबाबत चा शासन निर्णय दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२१. निर्गमित झाला.

यामध्ये नमूद केल्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर सन २०२६-२७ पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केले नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरीत एक राष्ट्रीय अभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे आणि सदर अभियानात विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे असे सांगितले. त्यासाठी भारत सरकारने “समग्र शिक्षा" मध्ये निपुण भारत (National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ३ री पर्यंत मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन २०२६ २७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. याकरिता कृती आराखडा तयार करणे, विषयसूची व प्राधान्यक्रम ठरविण्याची गरज आहे. यासाठी जिज्ञासूपणास वाव देणारा अभ्यासक्रम व शैक्षणिक साहित्य (ऑफलाईन व ऑनलाईन), निश्चित क्षमता विधाने (Learning Competencies) व अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes), शिक्षक सक्षमीकरण, मूल्यमापनाची तंत्रे इत्यादी विकसित करणे आवश्यक असल्याबाबत सांगितले.

दिनांक २२ जून, २०१५ च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचे महाराष्ट्रातील शाळांमध्ये नियमितपणे जाणाऱ्या प्रत्येक मुलाने मुलभूत अध्ययन क्षमता प्राप्त करणे. कोणतेही मूल अभ्यासात

मागे न राहणे हे ध्येय होते. याकरीता अधिकाऱ्यांनी, शाळा व्यवस्थापनाने व अधिक महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांनी या कार्यक्रमाला गती दिली. सन २०१४, २०१६ व २०१८ च्या ASER अहवालानुसार या कार्यक्रमास प्रचंड यश मिळाले. तथापि, कोविड १९ च्या वैश्विक महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला.

कोरोना महामारीमुळे सध्याची स्थिती व गेल्या कालावधीत शाळा सतत बंद राहिल्यामुळे झालेले नुकसान लक्षात घेता पुढील काळात शिक्षणाचा पाया "पायाभूत शिक्षण" असणे आवश्यक आहे. त्यामुळे २०२३ -२३ या शैक्षणिक वर्षातील शिक्षण परिषदा या NIPUN भारत अमलबजावणी वर आधारित घेण्यात आल्या.

## उद्दिष्ट्ये

१. शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास करणे.
२. NIPUN भारत अभियानाची अंमलबजावणी बजावणी अधिक प्रभावी होण्यासाठी प्रत्येक महिन्याला विविध विषयांवर आधारित जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकांचे उद्बोधन करणे.

## कार्यवाही

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियानाचे प्रमुख ध्येय म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तीसरीपर्यंत पायाभूत लेखन वाचन व गणितीय कौशल्य प्राप्त करणे. हे ध्येय सन २०२६-२७ पर्यंत साध्य होईल. कोणतेही मूल त्याच्या शैक्षणिक प्रवासात मागे राहणार नाही व पुढील आयुष्यात त्याच्या व्यक्तिमत्वावर नकारात्मक परिणाम होणार नाही.

३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा प्रारंभिक भाषा विकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषा ज्ञान, समजपूर्वक ऐकणे व त्याचे आकलन, मुद्रणशास्त्र व उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे गरजेचे आहे.

पायाभूत संख्या साक्षरता म्हणजे दैनंदिन प्रश्न सोडवण्यासाठी साध्या संख्यात्मक कल्पनांचा वापर करण्याची क्षमता. संख्या पूर्व व संख्या कल्पनेचा विकास, तुलना करण्याचे ज्ञान व कौशल्य, क्रमशः मांडणी करणे, आकृतीबंध / संरचना ओळखणे व त्याचे वर्गीकरण. जुलै २०२३ ते ऑक्टोबर२०२३ या शिक्षण परिषदा पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावर आधारित होत्या.

निपुण भारत अभियानानुसार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सातारा जिल्ह्यात इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत गुणवत्ता / क्षमता वृद्धी कार्यक्रम राबविण्यात आला होता. दि. १९ डिसेंबर २०२३ ते दि. ११ फेब्रुवारी २०२३ या आठ आठवड्यांच्या कालावधीत सदर उपक्रमाची शालेय पातळीवर अंमलबजावणी करण्यात आली. भाषा व गणित विषयासाठी ८ आठवडे दिवस निहाय कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. इ. २ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यांची ३ स्तरात विभागणी करून हा उपक्रम शालेय पातळीवरती आपण यशस्वीपणे राबविला आहे. या उपक्रमाची परिणामकारता तपासणे तसेच विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता संपादणूकीची पडताळणी करण्यासाठी दि. २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत संपादणूक सर्वेक्षण घेण्यात येत आहे. जिल्हा परिषद शाळांमधील इ. २ री ते ५ वीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सर्वेक्षणात समावेश करण्यात येईल.

## महिनावार शिक्षण परिषदांची फलनिष्पत्ती

| महिना | विषय | लाभार्थी / उपस्थित संख्या |
|---|---|---|
| केंद्रस्तर शिक्षण परिषदा जुलै २०२३ | १. विद्याप्रवेश<br>२. निपुण मित्र ३. NAS आणि PGI माहिती<br>विश्लेषण<br>३. निपुण भारत स्तर निश्चिती | • जिल्हास्तर शिक्षण परिषद सहभाग ७०० (केंद्राप्रमुख साधनव्यक्ती, निपुण मित्र.)<br>• केंद्रस्तर शिक्षण परिषद सहभाग १६.६८२ शिक्षक |

| | | |
|---|---|---|
| | पायाभूत शिक्षण | |
| केंद्रस्तर शिक्षण परिषदा ऑगस्ट २०२३ | १.विकासात्मक ध्येय्य<br>२. शिक्षक भूमिका<br>३. भाषा आणि गणित पेटी गटकार्य सादरीकरण | • जिल्हास्तर शिक्षण परिषद सहभाग, ऑफलाईन ०० (केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती, निपुण मित्र.)<br>• तालुकास्तर शिक्षण परिषद ऑफलाईन ५५० (केंद्रप्रमुख साधन व्यक्ती निपुण मित्र)<br>• केंद्रस्तर शिक्षण परिषद सहभाग ११००० शिक्षक |
| केंद्रस्तर शिक्षण परिषदा सप्टेंबर२०२३ | १. FLS सर्वेक्षण सादरीकरण २. भाषा आणि गणित उपघटक आणि गटकार्य सादरीकरण<br>३. विद्याजली पोर्टल शाळा नोंदणी | • तालुकास्तर शिक्षण परिषद् ऑफलाईन ५६० (केंद्राप्रमुख साधन व्यक्त निपुण मित्र.) |
| ऑक्टोबर २०२३ | शिक्षक प ९. नमुना पाठ सादरीकरण आणि चर्चा (मराठी, गणित जी विज्ञान समाजशास्त्र)<br>व्यक्ती निपुण मित्र.) | • केंद्रस्तर शिक्षण परिषद सहभाग १०५०० शिक्षक<br>• जिल्हास्तर शिक्षण परिषद सहभाग ऑफलाईन ४०० (केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती, |

| | | |
|---|---|---|
| | | निपुण मित्र.)<br>• केंद्रस्तर शिक्षण परिषद सहभाग ११००० शिक्षक |
| डिसेंबर २०२३ | १. निपुण भारत स्तर निश्चिती गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम- अंमलबजावणी सूचना<br>२.आठ आठवड्याच्या दिवस निहाय उपक्रमांचे सादरीकरण<br>३. विद्यार्थी संपादणूक माहिती संकलन | • मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.<br>• शिक्षण परिषद Online पद्धतीने पार पडली.<br>• शिक्षण परिषद १८००० शिक्षकांनी youtube द्वारे पहिली |
| फेब्रुवारी | निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम - सर्वेक्षण सूचना<br>२. सर्वेक्षण साहित्य सादरीकरण<br>३. विद्यार्थी संपादणूक माहिती संकलन प्रक्रिया | • . शोभा खंदारे,प्राचार्य, यांनी शिक्षकांस मार्गदशन केले.<br>• शिक्षण परिषद Online पद्धतीने पार पडली.<br>• शिक्षण परिषद १४००० शिक्षकांनी youtube द्वारे पहिली |

## *अभ्यासक्रम विकसन व मूल्यमापन ,शैक्षणिक माहिती व तंत्रज्ञान ,संदर्भ साहित्य विकसन विभाग*

या विभागामार्फत खालील कार्य केली जातात .

१. बदलत्या अभ्यासक्रमानुसार व पाठ्यपुस्तकानुसार सर्व शिक्षकांना प्रशिक्षण देणे तसेच नविन शैक्षणिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे.

२. अध्ययन -अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविणे.

३. इयत्तानिहाय विद्यार्थ्यांचा अध्ययनस्तर तपासणे व तो विकसित करणे.यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन

करण्यासाठी संदर्भ साहित्य विकसन करणे.

४. विद्यार्थी संपादणूक मूल्यमापनाबाबत शिक्षकांचे उद्बबोधन करणे.

५. अध्ययन -अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सातारा ,येथील अभ्यासक्रम विकसन व मूल्यमापन ,शैक्षणिक माहिती व तंत्रज्ञान ,संदर्भ साहित्य विकसन विभागामार्फात वर्ष २०२३ -२३ मध्ये खालीलप्रमाणे उपक्रम /प्रशिक्षण घेण्यात आली आहेत

## **१.सर्वेक्षणाचे नाव:** राज्य शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण (SEAS-PARAKH)

**दिनांक व कालावधी:** २ आणि ३ नोव्हेंबर, २०२३

**आयोजनाचे ठिकाण:** जिल्हा स्तर (Online) व तालुका स्तर

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: NCERT, नवी दिल्ली व SCERTM, सातारा .

**एकूण खर्च:** १०,९६,१८९/- रुपये.

**सहभागी शाळा संख्या:** ७८८ (मराठी - ५६६ उर्दू - ०५ इंग्रजी - २१७ = ७८८)

**सहभागी शिक्षक संख्या:** ७८८

**उद्दिष्ट:** १. राज्यातील / जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती संपादणूकीची सद्यस्थिती अभ्यासणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** १. जिल्हा स्तरीय प्रशिक्षण - तालुका स्तरीय प्रशिक्षण आयोजन.

२. क्षेत्रीय अन्वेषक यांचे सर्वेक्षण पूर्व सर्वेक्षण (दि. ०२/११/२०२३).

३. प्रत्यक्ष सर्वेक्षण (दि. ०३/११/२०२३)

**अपेक्षित निष्पत्ती:** १. सर्वेक्षणाचे यशस्वी नियोजन व आयोजन करण्यात आले.

**सुधारणात्मक बाबी: निरंक**

## **२.प्रशिक्षणाचे नाव:** अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन (MLI) आणि सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) (इ. ०१ वी ते ०८ वी) व शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण (इ. ९ वी ते १२ वी)

**दिनांक व कालावधी:** इयत्ता १ ली ते ५ वी : १२ डिसेंबर, २०२३ ते ०३ जानेवारी, २०२४

इयत्ता ६ वी ते ८ वी : १६ जानेवारी, २०२४ ते ९ फेब्रुवारी, २०२४

इयत्ता ९ वी ते १० वी : २१ फेब्रुवारी, २०२४ ते २८ फेब्रुवारी, २०२४

इयत्ता ११ वी ते १२ वी : २९ फेब्रुवारी, २०२४ ते ०६ मार्च, २०२४

**आयोजनाचे ठिकाण:** यशोदा टेक्निकल कॅम्पस, वाढे फाटा, सातारा

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: SCERTM, सातारा

**सहभागी शिक्षक संख्या: एकूण: १९२१**

इयत्ता १ ली ते ५ वी : ८४३

इयत्ता ६ वी ते ८ वी : ४२१

इयत्ता ९ वी ते १० वी : ४१२

इयत्ता ११ वी ते १२ वी : २४५

**उद्दिष्ट:** १. विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकीमध्ये वृद्धीकरिता अध्ययन कौशल्य वृद्धी करणे.

२. विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकीतील वाढी करिता अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन करणे.

३. परिणामकारक अध्ययन अध्यापनकरिता शिक्षक क्षमता वृद्धी करणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** Drive Link :

**अपेक्षित निष्पत्ती:** NAS / SEAS/ SLAS यांसारख्या सर्वेक्षणामध्ये अध्ययन संपादणूक वृद्धी होणे.

२. शिक्षकांना अध्ययन अध्यापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धतींची ओळख झाली.

३. दैनंदिन अध्यापन मनोरंजनात्मकता व परिणामकारक होण्यास मदत झाली.

## ३.पायलट स्टडीचे नाव: Holistic Progress Card (HPC)

प्राथमिक व माध्यमिक शाळा शिक्षक

**दिनांक व कालावधी:** जानेवारी २०२४

**आयोजनाचे ठिकाण:** फलटण

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालयाचे नाव:** NCERT, नवी दिल्ली

**सहभागी शाळा संख्या:** ०५

**सहभागी शिक्षक संख्या:** ०६

**उद्देश:** १. Holistic Progress Card (HPC) भरण्यासाठी शिक्षकांना येणाऱ्या अडचणी जाणून घेणे.

२. Holistic Progress Card (HPC) भरण्याबाबत शिक्षकांकडून Feedback घेणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** १. विद्यार्थ्यांसाठी कृतींची निश्चिती/निर्मिती करणे.

२. रुब्रीक्स तयार करणे.

३. निर्मिती केलेल्या कृतींद्वारे मुल्यांकन करणे.

**अपेक्षित निष्पत्ती:** १. Holistic Progress Card (HPC) मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण मुल्यांकना करिता उपयुक्त बदल करण्यास मदत होईल.

## ४. प्रशिक्षणाचे नाव: दीक्षा अंतर्गत शिक्षक क्षमता बांधणी.

**दिनांक व कालावधी:** ०१/०२/२०२४

**आयोजनाचे ठिकाण:** जिजामाता अध्यापक विद्यालय, सातारा

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: SCERTM, सातारा

**एकूण खर्च: ३४५५**

**सहभागी शिक्षक संख्या:** १५

**उद्दिष्ट:** १. शिक्षकांना दीक्षा या डिजिटल व्यासपीठावर आशय तयार करण्यास मदत करणे.

२. दीक्षा या डिजिटल व्यासपीठाकरिता तांत्रिक कौशल्य विकसित करण्यास मदत करणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** आशय निर्मितीचे निकष, तांत्रिक कौशल्ये.

**अपेक्षित निष्पत्ती:** १. शिक्षकांना दीक्षा या डिजिटल व्यासपीठावर आशय तयार करण्याबाबत प्रोत्साहन मिळाले.

२. शिक्षकांना दीक्षा या डिजिटल व्यासपीठाकरिता आवश्यक तांत्रिक कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली.

**सुधारणात्मक बाबी: निरंक**

## ५. प्रशिक्षणाचे नाव: दीक्षा अंतर्गत आशय निर्मिती प्रशिक्षण

**दिनांक व कालावधी:** ०२/०२/२०२४

**आयोजनाचे ठिकाण:** जिजामाता अध्यापक विद्यालय, सातारा

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: SCERTM, सातारा

**एकूण खर्च: १८०८३**

**सहभागी शिक्षक संख्या:** ५३

सहभागी सुलभक संख्या : ०३

**उद्दिष्ट:** १. शिक्षकांना विषयनिहाय / थीम निहाय आशय तयार करण्यास मदत करणे.

२. डिजिटल व्यासपीठाकरिता विषयनिहाय / थीम निहाय आशय तयार करण्याकरिता तांत्रिक कौशल्य विकसित करण्यास मदत करणे.

३. व्हिडीओ निर्मिती करिता आवश्यक असलेले ॲप व Software ची ओळख करून देणे.

४. व्हिडीओ निर्मिती करण्याकरिता ॲप व Software च्या आधारे व्हिडीओ निर्मिती करण्याचे Hands on प्रशिक्षण देणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** आशय निर्मितीचे निकष, तांत्रिक कौशल्ये.

**अपेक्षित निष्पत्ती:** १. शिक्षकांना दीक्षा या डिजिटल व्यासपीठासह दैनंदिन अध्ययन अध्यापनामध्ये डिजिटल साधनाचा उपयोग करता आला.

२. डिजिटल आशय तयार करणे व  वापर करण्यास प्रोत्साहन मिळाले..

३. डिजिटल आशय निर्मिती करिता आवश्यक तांत्रिक कौशल्ये विकसित झाली.

## ६. स्पर्धेचे नाव: व्हिडीओ निर्मिती स्पर्धा (तालुका – जिल्हा – राज्य स्तर)

**दिनांक व कालावधी:** ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२३

**आयोजनाचे ठिकाण:** जिल्हा स्तर

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: SCERTM, सातारा

**एकूण निर्मिती केलेली व्हिडीओ संख्या:**

**उद्दिष्ट:** १. शिक्षकांनी अध्ययन अध्यापनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी व्हिडीओ निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे.

२. शिक्षकांना व्हिडीओ निर्मिती करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

३. शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण करून दर्जेदार व्हिडीओ निर्मिती करण्यास उत्तेजन देणे.

**केलेल्या कृती:** केंद्र व तालुका स्तरावर जाणीव जागृती प्रशिक्षण व बैठकांचे आयोजन

**अपेक्षित निष्पत्ती: १.** प्रथम टप्प्यामध्ये राज्यामधून सर्वाधिक व्हिडीओ निर्मिती करण्यात आली.

२. शिक्षकांना व्हिडीओ निर्मीती करण्याकरिता प्रोत्साहन मिळाले.

३. दैनंदिन अध्यापनामध्ये व्हिडीओ चा वापर करण्याची जाणीव निर्माण झाली.

## ७. प्रशिक्षण: प्रश्न निर्मिती आणि भाषा व गणित अध्ययन पेटीच्या प्रभावी वापराबाबत प्रशिक्षण

**दिनांक व कालावधी:** फेब्रुवारी २०२४

**आयोजनाचे ठिकाण:** म. गांधी अध्यापक विद्यालय, सातारा

**आयोजनाबाबत सूचित केलेल्या वरिष्ठ कार्यालय/NGO/अन्य याचे नाव**: जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण, सातारा

**सहभागी सुलभक संख्या:** ०२

**सहभागी शिक्षक संख्या:** ४८

**उद्दिष्ट:** १. विषय निहाय व अध्ययन निष्पत्तीनिहाय प्रश्न निर्मिती करण्यास मदत करणे.

२. भाषा व गणित पेटीचा परिणामकारक वापर करण्यास मदत करणे.

**केलेल्या कृती/मोड्यूल ची नावे:** अध्ययन निष्पत्ती निहाय प्रश्न निर्मिती, भाषा पेटीचा परिणामकारक वापर, गणित पेटीचा परिणामकारक वापर

**अपेक्षित निष्पत्ती:** १. विषय निहाय व अध्ययन निष्पत्ती निहाय प्रश्न निर्मिती करता येईल**.**

२. भाषा पेटी व गणित पेटीचा परिणामकारक वापर करणे.

३. स्थानिक स्त्रोतांमधून अध्ययन अध्यापन साहित्य निर्मिती करणे व उपयोगात आणणे.

## ८.पायलट स्टडी :- दीक्षा पोर्टलवर विशेष शिक्षण (समावेशित शिक्षण) या ऑनलाईन कोर्सचा पथदर्शी अभ्यास .

**दिनांक व कालावधी:-**

दि.११.९.२०२३ ते दि.२० .९ .२०२३ - एकूण १० दिवस

**आयोजनाचे ठिकाण** :-ऑनलाईन -दीक्षा पोर्टल

**आयोजनाबाबत सूचित केलेले वरिष्ठ कार्यालय** :-राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,सातारा

**सहभागी शिक्षक संख्या** :-१०

**सुलभक संख्या** :-०२

**उद्देश:-**

शिक्षकांच्या गरजाधिष्ठित प्रशिक्षणासाठी विशेष शिक्षण( समावेशित शिक्षण ) हा ऑनलाईन कोर्स प्रमाणित करून दीक्षा पोर्टलवर अपलोड करणे .

**कार्यवाही** :-विशेष शिक्षण (समावेशित शिक्षण )या विषयावर ऑनलाईन कोर्सची निर्मिती डायट फलटणद्वारे करण्यात आली. सदर कोर्स दीक्षा पोर्टलवर अपलोड करण्यात आला. निवडक शिक्षकांद्वारे कोर्सचा पथदर्शी अभ्यास करण्यात आला .

**अपेक्षित निष्पत्ती** :-

राज्यातील शिक्षकांसाठी संबंधित कोर्स उपलब्ध करण्यास योग्य असणे बाबत प्रमाणपत्र देण्यात आले .

**आलेल्या अडचणी** :- ऑनलाईन पथदर्शी अभ्यास असल्याने इंटरनेटच्या अडथळ्यामुळे सातत्य कमी राहत होते .

## ९.प्रशिक्षणाचे नाव :- ब्लेंडेड कोर्स साठी PLC प्रशिक्षण

**दिनांक व कालावधी:-**

दि.२३/ ३/ २४ ते दि. २४/ ३/ २४ - ०२ दिवस

**आयोजनाचे ठिकाण** :-क्रांती स्मृती अध्यापक विद्यालय ,सातारा

**आयोजनाबाबत सूचित केलेले वरिष्ठ कार्यालय** :-

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,सातारा

**सहभागी शिक्षक संख्या** :-५०

**सुलभक संख्या:-** ०५

**उद्देश:-**

राज्यातील दीक्षा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ब्लेंडेड मोड स्वरूपातील कोर्सच्या PLC साठी तज्ज्ञ प्रशिक्षणार्थी तयार करणे .

**कार्यवाही** :-

सातारा जिल्ह्यातील बी.आर.सी./यु.आर.सी.स्तरावरील प्राथमिक व माध्यमिक ब्लेंडेड कोर्स साठी प्रत्येकी ०५ तज्ज्ञ सुलभकांची निवड करण्यात आली. प्राथमिक व माध्यमिक दोन्ही स्तरासाठी मराठी- ०१,गणित -०१, विज्ञान- ०१,इंग्रजी- ०१,व सामाजिक शास्त्र- ०१ असे एकूण ०५ विषयांसाठी ०५ तज्ज्ञ निवडण्यात आले. **अपेक्षित निष्पत्ती** :-राज्यातील दीक्षा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या मराठी, गणित, विज्ञान ,इंग्रजी व सामाजिक शास्त्र या विषयांच्या ब्लेंडेड मोड स्वरूपातील कोर्सच्या PLC साठी सातारा जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यासाठी प्रत्येकी ०५ प्रमाणे ५५ तज्ज्ञ सुलभकांची निर्मिती करण्यात आली.

# १०.सेतू अभ्यासक्रम

**पार्श्वभूमी**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन शैक्षणिक वर्षामध्ये नियमित शाळा सुरु होऊ शकल्या नाहीत. या आव्हानात्मक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा अध्ययन ऱ्हास (Learning loss) झाल्याचे विविध सर्वेक्षणानुसार निदर्शनास येत होते. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) २०२१ मधील भाषा,गणित,विज्ञान,इंग्रजी व सामाजिक शास्त्र या विषयातील राज्यातील विद्यार्थ्यांची संपादणूक कमी दिसून येत होती. कोरोना काळात शाळा बंद असल्याकारणाने विद्यार्थ्यांमध्ये इयत्तानिहाय आणि विषयनिहाय क्षमता संपादित करण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या होत्शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शाळा पूर्ण क्षमतेने आणि नियमितपणे सुरु झालेल्या नसल्याने विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय आणि विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती संपादन करण्यामध्ये अडसर निर्माण झाला. त्यामुळे राज्यस्तरावरून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ प्रमाणेच २०२३ -२३ मध्येही इ.२ ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यासाची (Bridge Course) अंमलबजावणी करण्यात आली.

**कार्यवाही** :

- इयत्ता २ री ते १० वी च्या मराठी, इंग्रजी, सामान्य विज्ञान, गणित आणि सामाजिक शास्त्र या विषयांसाठी पुनर्रचित सेतू अभ्यास तयार करण्यात आलेला होता.
- सदर अभ्यास इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला होता. मागील इयत्तांच्या महत्वाच्या क्षमतांवर आधारित होता.

- पुनर्रचित सेतू अभ्यास हा ३० दिवसासाठी राबविण्यात आला. (शालेय कामकाजाचे दिवस) यामध्ये दिवसनिहाय कृतीपत्रिका (worksheets) देण्यात आलेल्या होत्या.

- हा कोर्स मराठी, उर्दू आणि इंग्रजी इत्यादी माध्यमातून तयार करण्यात आलेला होता.
- पुनर्रचित सेतू अभ्यासाच्या अंमलबजावणी विषयक शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सविस्तर सूचना सेतू अभ्यासाच्या सुरुवातीला देण्यात आलेल्या होत्या.
- पुनर्रचित सेतू अभ्यासातील कृतीपत्रिका या विद्यार्थीकेंद्रित व कृतीकेंद्रित तसेच अध्ययन निष्पत्तीवर आधारित होत्या. विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंअध्ययन करू शकतील असे त्याचे स्वरूप होते.
- विषयातील संबोध स्पष्टतेकरिता ई-साहित्याच्या लिंक्स देण्यात आलेल्या होत्या.
- सेतू अभ्यासातील विषयनिहाय कृतीपत्रिका प्रत्येक विद्यार्थी दिवसनिहाय सोडवतील याप्रकारे नियोजन देण्यात आलेले होते.
- पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणीचा यामध्ये समावेश करण्यात आलेला होता.

**सेतू अभ्यास अंमलबजावणी कालावधी:**

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १ | पूर्व चाचणी | दि.१७ ते १८ जून, २०२३ |
| २ | ३० दिवसांचा सेतू अभ्यास | दि.२० जून ते २३ जुलै,२०२३ . |
| ३ | उत्तर चाचणी | दि.२५ ते २६ जुलै , २०२३ |

## ११ . राष्ट्रीय संपादणूक चाचणी (NAS) : माहिती विश्लेषण

राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती संदर्भात विद्यार्थ्यांची प्रगती समजून घेणे तसेच अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील अडथळे दूर करणे .शिक्षक प्रशिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी भारत सरकार शिक्षण मंत्रालय ,CBSE बोर्ड व NCERT व SCERT यांच्या मार्फत सदर परीक्षा घेण्यात येते .

**उद्दिष्टे**

१ शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी मुल्यांकन ,अध्याप्न्शास्त्रीय प्रक्रिया आणि LEARNING OUTCOMES संपादणूक समजून घेण्यासाठी संशोधक,शैक्षणिक नियोजक आणि धोरण निर्मात्यांसाठी उपयुक्त

२ विद्यार्थ्यांची शाळा दीर्घकाळ बंद असल्यावर त्यांच्यावर झालेल्या सामाजिक §भावनिक विकासाच्या परिणामांचा अभ्यास करणे.

३ चाचणी अहवालाच्या मदतीने जिल्हा निहाय गुणवत्ता वृद्धीसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व शिक्षण क्षेत्रातील अधिकार्यांना गुणवत्तापूर्ण कार्य करण्यासाठी नियोजन व अंमलबजावणीसाठी दिशा देणे .

सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण अंतर्गत इयत्ता ३,५ ,८ व १०च्या विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तीचे विश्लेषण केले असता पर्विद्यार्थी गुनवत्तेसंदर्भात खालीलप्रमाणे परिस्थिती दिसून येते .

# संशोधन,क्षेत्रीय आंतरक्रिया ,समता विभाग

या विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्य केली जातात

१. राज्यस्तरीय,विभागस्तरीय,जिल्हा स्तरीय अशा विविध स्तरांवर लघुसंशोधन व व्यक्ती अभ्यास करणे,नवोपक्रम स्पर्धांचे आयोजन व मूल्यमापन करणे .

२. समतामूलक विचारांची रुजवणूक करणे ,बालरक्षक चळवळीचा प्रचार व प्रसार करणे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,सातारा अंतर्गत कार्यरत या संशोधन,क्षेत्रीय आंतरक्रिया ,समता विभागामार्फत सन २०२३ -२३ या कालावधीत खालीलप्रमाणे उपक्रम प्रशिक्षण घेण्यात आले .

१.प्रशिक्षणाचे नाव :- PRASHAST ( Pre assessment holistic screeing tool ) mobile app

प्रशिक्षण दिनांक व कालावधी :- १) दि. २६/०६/२०२३ रोजी एक दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात आले.

कार्यालयाचे नाव :- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण ( सातारा )

सहभागी संख्या :- २१ रिसोर्स पर्सन व ५० रिसोर्स टीचर

सुलभक संख्या :- २

**अपेक्षित उद्दिष्ट :-**

१) सर्व प्रकारच्या माध्यमातील शाळांच्या कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापक यांना prashast app वापरण्यासाठी प्रशिक्षण देणे.

२)prashast app download करणे व सर्व शिक्षकांना त्याचा वापर करणे बाबतीत प्रशिक्षण देणे.

**कार्यवाही :-**

रिसोर्स पर्सन व रिसोर्स टीचर यांना दि.२६/०६/२०२३ रोजी app बाबतीत सविस्तर राज्यस्तरावरून online प्रशिक्षण देण्यात आले. दि.२२/०८/ २०२३ रोजी संबंधितांनी केलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.शिक्षण परिषद पूर्व तयारी मध्ये सर्व केंद्रस्तरावर सुलभक तयार करण्यात आले. त्यानुसार दि.२६/०८/२०२३ रोजीच्या शिक्षण परिषदेसाठी जिल्ह्यातील २२७ केंद्रांमध्ये केंद्र निहाय prashast aap या विषयासाठी शिक्षण परिषद आयोजित केली होती. आलेल्या नियोजनानुसार शिक्षण परिषेदेत संबंधित सुलभकांनी कार्यरत सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांना prashast app बाबतीत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले. तसे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. आले.त्यानुसार सर्व शाळांच्या शिक्षक व मुख्याध्यापक यांना येणाऱ्या आव्हानांवर माहिती देण्यात आली. सर्व शाळातील संबंधित शिक्षक यांनी prashast app वरील आपल्या कामाशी निघडीत माहिती app वर भरलेली आहे.

**अपेक्षित निष्पत्ती :-**

दिव्यांग बालकांचा शोध व शीघ्र ओळख करण्यात येऊन लवकरात लवकर वैद्यकीय व शैक्षणिक सेवा सुविधा मिळवून देणे.

**आलेल्या अडचणी** :-

नेटवर्क समस्या येत आहेत.सदर app दोन विभागात विभागलेले आहे. दोन्ही विभागात कामकाज करता येत नाही.app योग्य पद्धतीने कार्यरत नाही.सद्यस्थितीत या app मध्ये बदल करण्याचे काम सुरु असल्याने पूर्वी भरलेली माहिती app वर दिसत नाही.सदर माहिती नव्याने भरताना aap कार्यरत नाही.

## २ .समता सप्ताह ( समान संधी दिवस ) साजरा करण्यात आला.

उपक्रमाचा  कालावधी :-  दिनांक ०३ ते दि.०९ डिसेंबर २०२३ या कालावधीत समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत समता सप्ताह ( समान संधी दिवस ) साजरा करण्यात आला.

खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

१.दि.४ /१२/२०२३ शाळा स्तरावर जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शाळा व महाविध्यालयात जनजागृती पर घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली.

२.दि.५/१२/२०२३ व दि.६/१२/२०२३ रोजी केंद्र स्तरावर चित्रकला,रांगोळी,निबंध व इतर गरजेनुसार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

३.दि.७/१२/२०२३ रोजी तालुकास्तर  विशेष गरजा असणार्या विध्यार्थी व पालकांसाठी परिसंवाद व चर्चासत्र घेण्यात आले. कार्यक्रमाचे  स्वरूप  online / ofline

४.दि. ८/१२/२०२३ रोजी तालुकास्तर दिव्यांग गुणवंत विध्यार्थी मुलाखत कार्यक्रमाचे  स्वरूप online  / ofline

५.दि.९/१२/२०२३ रोजी जिल्हास्तर कार्यरत विशेष शिक्षक व विशेष तज्ञ पर्यवेक्षीय  यंत्रणा यांचेसाठी यशस्वी दिव्यांग व्यक्तीची प्रेरणादायी मुलाखत घेण्यात आली.

**आयोजन ठिकाण :-**

जिल्ह्यातील सर्व शाळा,केंद्र शाळा,गटसाधन केंद्र, ( जिल्हास्तर उपक्रम online स्वरुपात घेण्यात आले.

कार्यालयाचे नाव :- पंचायत समिती सर्व,जि,प, सातारा,शिक्षण विभाग,( प्राथमिक / माध्यमिक ) जिल्हा परिषद सातारा.तसेच  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण, जि.सातारा यांच्या संयुक्त विध्यमाने उपक्रम राबविण्यात आले.

सुलभक संख्या :-५० विशेष शिक्षक ,२२ विशेष तज्ञ,२ जिल्हा समन्वयक

### अपेक्षित उद्दिष्ट :-

दिव्यांग बालकांचा शोध व शीघ्र ओळख करण्यात येऊन लवकरात लवकर वैद्यकीय व शैक्षणिक सेवा सुविधा मिळवून देणे.विशेष गरजा धारक विध्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या मध्ये प्रत्येक दिव्यांग

विध्यार्थी अध्यायनार्थी आहे.हा दृष्टीकोन दृढ करून सर्व विध्यार्थी एकत्रित शिक्षण घेऊन स्वयंपूर्ण आयुष्य जगू शकतात.अशी मानवी भावना विकसित होईल.

**कार्यवाही :-**

जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शाळा व महाविध्यालयात जनजागृती पर घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली.

- चित्रकला,रांगोळी,निबंध व इतर गरजेनुसार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले
- विशेष गरजा असणार्या विध्यार्थी व पालकांसाठी परिसंवाद व
  चर्चासत्र घेण्यात आले. कार्यक्रमाचे स्वरूप online / ofline
- दिव्यांग गुणवंत विध्यार्थी मुलाखत कार्यक्रमाचे स्वरूप online / ofline
- जिल्हास्तर कार्यरत विशेष शिक्षक व विशेष तज्ञ पर्यवेक्षीय यंत्रणा यांचेसाठी
- यशस्वी दिव्यांग व्यक्तीची प्रेरणादायी मुलाखतघेण्यात आली.

**अपेक्षित निष्पत्ती :-** पर्यवेक्षीय यंत्रणा व समाज यांच्या सहकार्याने बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रोत्साहित करणे.

**आलेल्या अडचणी** :-

सदर उपक्रम राबविण्यासाठी कोणत्याही स्वरूपाचा निधी त्या कालावधीत उपलब्ध झाला नाही.त्यामुळे बक्षीस व इतर वेगळे उपक्रम करता आल्या नाहीत

## ३.नवोपक्रम मार्गदर्शन व जिल्हास्तर स्पर्धा

**दिनांक व कालावधी :-** २९ /८ /२०२३

एक दिवस **आयोजनाचे ठिकाण** :-जिजामाता ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

**आयोजन सूचित केलेले वरिष्ठ कार्यालय** :- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ,सातारा

**सहभागी अधिकारी व शिक्षक संख्या:-** ६२

**सुलभक संख्या:-** ०३

## उद्देश :-

१.नवोपक्रमाची संकल्पना स्पष्ट करणे २.नवोपक्रमाचे निकष स्पष्ट करणे

३.नवोपक्रम आव्हान लेखन विषयी मार्गदर्शन करणे

४.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सहभागी करण्यासाठी प्रेरित करणे

### कार्यवाही :-

सातारा जिल्ह्यातील इच्छुक अधिकारी व शिक्षक यांची गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदणी करण्यात आली. पूर्व प्राथमिक गट ,प्राथमिक गट ,माध्यमिक गट ,विषय सहाय्यक- साधन व्यक्ती व विशेष शिक्षक गट,पर्यवेक्षीय पर्यवेक्षकीय अधिकारी गट नुसार बैठक व्यवस्था करण्यात आली.पहिल्या सत्रात नवोपक्रम संकल्पना, नवोपक्रम निकष, नवोपक्रम अहवाल लेखन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दुपार सत्रात मागील वर्षात राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सहभागी दोन स्पर्धकांचे सादरीकरण करण्यात आले.त्यानंतर गटकार्य अंतर्गत गटनिहाय नवोपक्रम विषयांची यादी करण्यात आली. शेवटी शंका- समाधान घेण्यात आले.

## अपेक्षित निष्पत्ती :-

राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सन २०२३-२४ साठी प्रत्येक गटातून सातारा जिल्ह्याचा सहभाग. पूर्व प्राथमिक गटातून तीन स्पर्धक ,माध्यमिक गटातून एक स्पर्धक व साधन व्यक्ति गटातून एक स्पर्धक असे एकूण चार स्पर्धक राज्यस्तरावर सादरीकरण करण्यास पात्र ठरले.

**आलेल्या अडचणी त्रुटी:-** नवोपक्रमासाठी सातत्याने वैयक्तिक मार्गदर्शनासाठी वेळ अपुरा

## नवोपक्रम स्पर्धा( जिल्हास्तर)

**गरज:-**

१. शिक्षक शाळेमध्ये आपल्या स्तरावर विविध उपक्रम राबवत असतात या उपक्रमांची माहिती जिल्हास्तर व राज्यस्तरावर समजावी व शिक्षकांच्या पुढील कार्याकरिता त्यांना प्रोत्साहित करावे हा यामागील हेतू आहे म्हणून राज्यस्तरावरून म्हणजेच एस सी इ आर टी सातारा यांचेकडून आलेली लिंक जिल्ह्यातील सर्व शिक्षकांपर्यंत अधिकाऱ्यापर्यंत पोहोचविली जाते व त्यानुसार उत्कृष्ट नवोपक्रम असणारे शिक्षक निवडणे हे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते.

२. शिक्षकांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या पातळीवर केलेल्या कामाचे कौतुक करणे.

३. नवोपक्रम लिहिण्याची ले पद्धतशीर लेखन पद्धती शिक्षकांना माहिती करून देणे.

**पार्श्वभूमी:-**

राज्यस्तरावरून राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी हा एक उपक्रम आहे. ज्यामध्ये नवोपक्रमाची शास्त्रीय पद्धतीने जाण शिक्षकांमध्ये निर्माण करणे आवश्यक वाटते .तसेच शिक्षकांमध्ये असणारी संशोधन वृत्ती विकसित व्हावी याकरिता प्रोत्साहन देणे हा या उपक्रमागील महत्त्वाचा हेतू आहे. या सर्व बाबी जाणता त्याकरिता विशिष्ट वेळेमध्ये राबविले जाणारे उपक्रम राज्याकडे पाठविले जातात व त्याचे मूल्यांकन केले जाते. त्याकरिता काही डायट स्तरावरून कार्यशाळांचे

आयोजन देखील केले जाते . त्या आधारावर पुढील प्रक्रिया समजावून सांगितली जाते .तसेच या प्रक्रियेमधील लहान मोठे घटक विचारात घेऊन त्याकरिता शिक्षकांना योग्य त्या टप्प्यावर सहकार्य केले जाते.

**उद्दिष्टे:-**

१. शिक्षकांना नवोपक्रम लिहि याची पद्धती समजावून सांगणे.

२.  नवोपक्रमाचा शास्त्रशुद्ध पद्धतीने विचार करणे व शिफारशी सुचविणे सुचविणे.

३. शिक्षकांना त्यांच्या कामाकरिता व त्यांच्या कामामध्ये केलेल्या विशेष उल्लेखनीय बाबींकरिता प्रोत्साहित करणे.

**कार्यपद्धती:-**

१. राज्यस्तरावरून लिंक सर्व शिक्षकांपर्यंत पाठविली जाते

२. लिंक मध्ये भरलेल्या नवोपक्रमाचे मूल्यांकन हे जिल्हास्तर व राज्यस्तराकडून केले जाते हे मूल्यांकन करत असताना जिल्हास्तरावरील कमिटी ही त्यातील पद्धती प्रक्रिया टप्पे कार्यवाहीचे टप्पे फलनिष्पत्ती सत्यता वास्तविकता या सर्व गोष्टींवर मूल्यांकन करते व पहिल्या पाच मध्ये आलेले शिक्षकांचे नवोपक्रम हे राज्यस्तरावर पाठवून देते

३. राज्यस्तरावर एकूण  पाच अधिक दोन असे मूल्यांकन करून नंबर पाठविले जातात.

४. स्पर्धेमध्ये आलेले शिक्षक यांना मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक दिले जाते.

**फलनिष्पत्ती :-**

१. नवोपक्रम व इतर बाबींमध्ये शिक्षक शाळा स्तरावर जे उपक्रम राबवत असतात त्यांना प्रोत्साहन दिले गेले.

२. नवोपक्रम लिहिण्याची शास्त्रशुद्ध पद्धती शिक्षकांना समजली.

## ४.शाळा व्यवस्थापन समिती सभा :-

### पार्श्वभूमी

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अंतर्गत कलम २१ नुसार शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन केली जाते .सदर व्यवस्थापन समितीचे दर दोन वर्षांनी पुनर्गठन केले जाते .समाज,पालक व शाळा यांच्या समन्वयातून शालेय परिसरातील प्रत्येक मुल शाळेत दाखल करणे ,ते शाळेत नियमित येण्यासाठी प्रयत्न करणे ,त्याला आनंददायी पद्धतीने शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न करणे ,शालेय विकासासाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे , आर्थिक बाबीचे संनियंत्रण ,शालेय पोषण आहार ,शालेय स्वच्छता ,विद्यार्थी सुरक्षितता ,बालकांचे स्थलांतर रोखण्यासाठी शाळेच्या मदतीने कृती आराखडा तयार करणे अशा विद्यार्थ्यांच्या शाळेतील गुणवत्तेबाबत कार्य करण्यासाठी शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती कार्यरत आहेत .परंतु काही शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती विद्यार्थी गुणवत्तेसाठी अधिक सक्रीयतेनी कार्य करताना दिसून येतात तर काही ठिकाणी त्यांचे कार्य उदासीन दिसून येते .प्रत्येक मुल शाळेत येणे ,ते टिकविणे व त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे याबाबत सनियंत्रण करण्यासाठी शाळेला प्रत्येक महिन्यात शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये सुरु शालेय वर्षाच्या आवश्यकतेनुसार ठळकपणे कोणते विषय घ्यावेत यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सक्षमीकरण होण्यासाठी प्रत्येक महिन्यात कोणते विषय घ्यावेत याबात शालेय वर्ष सुरु होण्यापूर्वी आवश्यकतेनुसार विषयांचे नियोजन करण्यात आले . सदर विषय घेण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देऊन शालेय परिस्थितीनुसार इतर विषय घेण्यासंदर्भात सूचना देऊन त्याचा दरमहा अहवाल शालेय दप्तरी ठेवण्यासंदर्भात सूचना करण्यात आल्या .

### उद्दिष्टे

१ शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून १०० टक्के शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे

२ शालेय पातळीवर शळेच्या गुणवत्ता विकासासाठी एक सहकारी यंत्रणा म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेणे

३ शाळेच्या सामाजिक ,आर्थिक ,भौतिक व गुणवत्ता विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीचा सक्रीय सहभाग घेणे .

४ शाळेतील विद्यार्थी सुरक्षा ,स्वच्छता ,व्यसनाधीनता ,मुला-मुलींसाठी आरोग्य विषयक सुविधा इत्यादीबाबत शाळा व्यवस्थापन समितीचा सक्रीय सहभाग घेणे .

५ शिक्षण क्षेत्रातील योजना , बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ संदर्भात कार्य करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना सक्षम करणे .

**कार्यवाही**

सातारा जिल्ह्यात सन २०२३ -२३ या शैक्षणिक वर्षात शालेय गुणवत्तेसंदर्भात शाळा व्यवस्थापन समिती मासिक सभेमध्ये शालेय परिसरातील प्रत्येक मुल शाळेत आणणे ,ते टिकविणे व त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ,त्यासंदर्भातील सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये नेमकेपणाने कोणते विषय घेण्यात यावेत यासाठी शालेय वर्ष सुरु होण्यापूर्वी शिक्षक ,विषय साधन व्यक्ती ,विशेष साधन व्यक्ती ,विशेष शिक्षक यांच्या सभा घेण्यात आल्या.त्यानुसार सन २०२३ -२३ मध्ये शालेय गुनावात्तेसंदर्भात शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे साक्षामिकरण होण्यासाठी कोणत्या विषयांवर सदर मासिक सभांमध्ये चर्चा होणे अपेक्षित आहे त्याचे वार्षिक नियोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात आले .सदर विषय तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावनीच्या अनुषंगाणे शासनामार्फत शाळा स्तरावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रम /कार्यक्रमाबाबत प्रत्येक महिन्याच्या शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये घेण्यासंदर्भात सातारा जिल्हयातील शाळांना मार्गदर्शनपर सूचना देण्यात आल्या तसेच सदर सभेसाठी किती शालाव्यावस्थाप्न सदस्य उपस्थित होते याचे लिंक द्वारे संकलन करण्यात आले . प्रत्येक सभेत घेण्यात आलेल्या विषयांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | महिना | विषय |
|---|---|---|
| १ | जून २०२३ | • पटनोंदणी बाबतचा आढावा घेणे.<br>• राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,सातारा यांचे ०२/०६/२०२३ चे पत्रानुसार शाळापूर्व तयारी अभियान अंतर्गत शाळा सतरावरील दुसरा मेळावा आयोजित करणे या संदर्भात चर्चा करणे. नवागतांच्या स्वागताची तयारी करणे. / शाळापूर्व तयारी दुसरा टप्पा नियोजन करणे.<br>• पटनोंदणी यशस्वीतेसाठी शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण यासारख्या उपक्रमांचे नियोजन करणे.<br>• शालेय वार्षिक नियोजन / वार्षिक शैक्षणिक आराखड्यास मान्यता देणे.<br>• विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांचे नियोजन करणे.<br>• शाळा व्यवस्थापन समितीची मुदत संपली असल्यास शासन निर्णयानुसार शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठित करणे. |
| २ | जुलै २०२३ | • वर्गवार विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थितीचा आढावा घेणे.<br>• वर्गनिहाय गैरहजर मुलांचा आढावा घेणे व उपाययोजना करणे.<br>• विद्याप्रवेश कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी व चर्चा करणे.<br>• शाळाबाह्य सर्वेक्षण- (मिशन झिरो ड्रॉप आऊट) -शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व त्याबाबत बैठकीत चर्चा करणे.<br>• इयत्ता पहिली सृजन भारती (नविन अभ्यासक्रम ) एकात्मिक व द्विभाषिक पुस्तके मुलांपर्यंत पोहचली आहेत का याचा आढावा |

| | | |
|---|---|---|
| | | घेणे.<br>• निपुण भारत अभियान अंमलबजावणी बाबत SMC सदस्यांना अवगत करणे. केंद्रस्तर शिक्षण परिषद मध्ये १००% शिक्षकांचा सहभाग होता का याचा आढावा घेणे.<br>• शालेय गुणवत्ता वाढीसाठी शिक्षक,समाज सहभाग वाढविणे.<br>• शैक्षणिक उठाव / शाळा सुधार योजना उद्दिष्ट ठरविणे व नियोजन करणे.<br>• शालेय प्रतवारी, शाळा सिद्धीमधील प्रचलित स्थान उंचावण्यासाठी नियोजन करणे.<br>• सेतू अभ्यासक्रम उपक्रमामधील विद्यार्थ्यांचा प्रगतीचा आढावा शाळा व्यवस्थापन समिती यांना अवगत करणे. |
| ३ | ऑगस्ट २०२३ | • सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेचा आढावा घेणे.<br>• शासकीय योजना व जमाखर्चाचा आढावा घेणे व मंजुरी देणे.<br>• वर्गवार विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थितीचा आढावा घेणे.<br>• इयत्ता पहिली सृजन भारती (नविन अभ्यासक्रम ) एकात्मिक व द्विभाषिक पुस्तके मुलांपर्यंत पोहचली आहेत का याचा आढावा घेणे व दिनांक १७/०८/२०२३ व १८/०८/२०२३ रोजी झालेल्या प्रशिक्षणा संदर्भात चर्चा करणे.<br>• केंद्रस्तर शिक्षण परिषद मध्ये १००% शिक्षकांचा सहभाग होता का याचा आढावा घेणे.<br>• शालेय प्रतवारी, शाळा सिद्धीमधील प्रचलित स्थान उंचावण्यासाठी नियोजन करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ४ | सप्टेंबर 2023 | • मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे परिपत्रक जिल्हा परिषद ,सातारा यांचे जा.क्र./जिप/ शिक्षण / प्राथ.२/यो-२/१०२५/३८६७, दिनांक २४/०८/२०२३ या नुसार शाळेमध्ये होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना आखण्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती/शाळा विकास समिती यामध्ये सविस्तर चर्चा करून केलेल्या कार्यवाही चा अहवाल शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांना सादर करावा.<br>• मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे शाळा व्यवस्थापन समिती स्थापना करणे व पुनर्गठीत करणे दिनांक ३०/०८/२०२३ चे परिपत्रक संदर्भात कार्यवाही करणे.<br>• इ.१ ली ते ३ री च्या वर्गाचे माता-पालक गटांच्या विद्यार्थी गुणवत्ते संदर्भातील सद्य स्थितीबाबत चर्चा करणे.<br>• शाळाबाह्य विद्यार्थ्यांना वयानुरूप दाखल करून नियमित शालेय प्रवाहात असणे बाबत खात्री करणे.<br>• वर्गवार विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थितीचा आढावा घेऊन विद्यार्थी इयत्ता निहाय गुणवत्ते बाबत चर्चा करणे.<br>• मुलींच्या प्रमाणानुसार शौचालय व युरिनरी प्लांट उपलब्धते बाबत चर्चा करणे व उपलब्ध नसल्यास प्रमाणानुसार उपलब्ध करून देणे.<br>. |
| ५ | ऑक्टोबर २०२३ | • नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत साक्षरता व |

| | | |
|---|---|---|
| | | संख्याज्ञान (FLN) यातील घटकाबाबत SMC सदस्यांना माहिती देणे.<br>• पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) या बाबत शाळेतील सद्यस्थिती संदर्भात SMC सदस्यांशी चर्चा करणे व गुणवत्ता वाढीसाठी नियोजन करणे.<br>• मुलांचे हक्क आणि सुरक्षितता बाबत शाळेतील सद्यस्थिती बाबत चर्चा करणे व त्यासंदर्भात उपाययोजना करणे.<br>• विद्यांजली पोर्टल रजिस्ट्रेशन संदर्भात सद्यस्थिती व त्याबाबात चर्चा.<br>• इ.१ ली ते ३ री च्या वर्गाचे माता-पालक गटांच्या विद्यार्थी गुणवत्ते संदर्भातील सद्य स्थितीबाबत चर्चा करणे.<br>• परिसरात दाखल झालेल्या व शाळेत न येणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करणे व त्यांना नियमित शाळेत दाखल करणे.<br>• शाळाबाह्य विद्यार्थ्यांना वयानुरूप दाखल करून त्यांचे अध्ययन अध्यापनाबाबत चर्चा करून त्यातील अडथळे दूर करणे .. |
| | नोव्हेंबर २०२३ | • मा. शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य सातारा १ यांचे परिपत्रक दिनांक २७ ऑक्टोबर २०२३ च्या परिपत्रकाची वाचन व अमलबजावणी करणे. (सोबत पत्रक जोडले आहे)<br>• इयत्तानुसार प्रथम सत्र विद्यार्थी निकाल समिती समोर ठेवणे व इयत्ता निहाय विद्यार्थीच्या गुणवत्ते बाबत चर्चा करणे कमी संपादन क्षमता असणाऱ्या मुलांच्या तयारीसाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांच्या उपक्रमाचा आढावा घेणे. |

| | | |
|---|---|---|
| | डिसेंबर २०२३ | • मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये सुरु करण्यात आलेला (FLN) निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम यांच्या अंमलबजावणी बाबत चर्चा करणे.<br>• विविध कला - क्रिडा स्पर्धेचे नियोजन व सर्व विद्यार्थ्यांच्या सहभाग याबाबत चर्चा करणे.<br>• दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुविधा व गुणवत्ता यांचा आढावा घेणे.<br>• जागतिक दिव्यांग दिन (३ डिसेंबर ) झालेल्या कार्यक्रमाचे इतिवृत्त सभेसमोर सादर करणे.<br>• इ.१ ली ते ३ री च्या वर्गाचे माता-पालक गटांच्या विद्यार्थी गुणवत्ते संदर्भातील सद्य स्थितीबाबत चर्चा करणे<br>• FLN अंतर्गत इंग्रजी - तृतीय भाषा या विषयाच्या इ.१ ली ते ५ वी च्या "माय इंग्लिश वर्कबुक" कार्यपुस्तिकांचे वितरण व त्यांचा परिणामकारक वापर होणे बाबत चर्चा करणे.<br>• शाळेच्या प्रथम सत्राच्या निकालाचे विश्लेषण व चर्चा करून अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांचा कृती कार्यक्रम व उपाययोजना याबाबत चर्चा करणे. |
| | जानेवारी २०२३ | • निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम यांच्या अंमलबजावणी बाबत चर्चा करणे.<br>• इ.१ ली ते ३ री च्या वर्गाचे माता-पालक गटांच्या विद्यार्थी गुणवत्ते संदर्भातील Video पालकांपर्यंत पोहचत आहेत का याची खात्री करणे ,काही अडचणी येत असतील तर डायट ला संपर्क करणे व माता पालक गटाचे काम प्रभावीपणे होईल याबाबत चर्चा करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • निपुण भारत अध्ययन सर्वेक्षण अंतर्गत विद्यार्थ्याच्या सद्य स्थितीबाबत चर्चा करणे.<br>• शाळेचा U -DISE + ची माहिती भरणे बाबतच्या सद्य स्थितीबाबत चर्चा करणे |
| | फेब्रुवारी २०२३ | • अध्ययनस्तर निश्चीतीनंतर अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी कृती कार्यक्रम तयार करणे.<br>• गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम अंतिम चाचणी अहवालाबाबत चर्चा करणे,कमी संपादणूक पातळी असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबाबत प्रयत्न करणे व त्यासाठी कृती कार्यक्रम राबविणे.<br>• शाळाबाह्य स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी चर्चा व उपाययोजना करणे.<br>• २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे व सदर कार्यक्रमासाठी विज्ञान विषयाशी संबंधित तज्ञांना बोलवून व्याख्यान ,परिसंवाद ,विज्ञान प्रदर्शन आयोजित करणे. |
| | मार्च २०२३ | • अध्ययनस्तर निश्चीतीनंतर अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी कृती कार्यक्रम तयार करणे.<br>• दिलेले उपक्रम प्रभावीपणे राबविणे.<br>• गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम अंतिम चाचणी अहवालाबाबत चर्चा करणे,कमी संपादणूक पातळी असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबाबत प्रयत्न करणे व त्यासाठी कृती कार्यक्रम राबविणे.<br>• माता-पालक गट सक्रीय रहातील यासाठी त्यांचे समुपदेशन करणे व उन्हाळ्याच्या सुट्टीत माता-पालक गटाच्या सहाय्याने विद्यार्थ्याचे शिकणे सुरु राहील यासाठी शिक्षक,मुख्याध्यापक |

| | | |
|---|---|---|
| | | यांनी नियोजन करणे.<br>• या व्यत्तिरिक्त मुख्यध्यापकास किंवा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,सदस्य यांना शाळेसाठी आवश्यक वाटतील असे भौतिक सुविधा संदर्भातील विषय. |

सदर मासिक सभांमध्ये मा प्राचार्य ,वरिष्ठ अधिव्याख्याता ,अधिव्याख्याता ,विषय साधन व्यक्ती ,विशेष साधन व्यक्ती ,विशेष शिक्षक यांनी पूर्णवेळ उपस्थित राहून वेळापत्रकानुसार विषय घेण्यात येतात की नाही याबाबत निरीक्षण करून माहिती घेतली .

**फलनिष्पत्ती**

शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये मासिक निहाय नेमकेपणाने कोणते विषय घेण्यात यावे याबाबत शाळांपर्यंत विषय पोचविण्यात आले व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सक्षमीकरण करण्यात आले .

## ५."डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना  जिल्हा- सातारा

**आदर्श शाळा योजना-शासकीय दृष्टिक्षेप:**

"शासन निर्णय २६ ऑक्टोंबर २०२०  नुसार  राज्यातील ३०० जिल्हा परिषद शाळा "आदर्श शाळा" (Model School)  म्हणून विकसित करण्याचा निर्णय  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन  यांनी घेतला होता."

"शासन निर्णय ५ मार्च २०२१ नुसार स्थानिक स्वराज्य संस्था,  महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या  शाळा,  कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,  शासकीय विद्यानिकेतने व नागरी भागातील शाळा यांचा समावेश करुन प्रथम टप्प्यात ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता देण्यात आली  आहे."

"शासन निर्णय २२ जून २०२२ नुसार सदर योजनेला डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना असे नाव देण्यात आले आहे."

सदर आदर्श शाळांमध्ये सातारा  जिल्ह्यातील खालील २५  शाळांची निवड झालेली आहे:

**योजनेचे उद्दिष्टे:**

१. शिक्षणातून मुलांचा शारीरिक, बौध्दिक व मानसिक विकास करणे.
२. प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक सर्व सुविधांनी युक्त व गुणवत्तेत अग्रेसर आदर्श शाळा निर्माण करणे.
३. नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र वापरून पाहणे.
४. पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम, मूल्यमापन आणि शालेय प्रशासन यामध्ये आदर्श होणे.
५. २१ व्या शतकाची कौशल्ये जाणीवपूर्वक विकसित करण्यासाठी अध्ययन अनुभव देणे.
६. पालकांचा सहभाग शालेय व सहशालेय उपक्रमात घेण्यासाठी तयार असणे.

**सातारा  जिल्हा कामाचा अहवाल-**

१. **परिस्थितीजन्य अभ्यास**

अ. शाळांच्या गरजा निश्चित करण्यासाठी पथदर्शी प्रकल्पातील प्रत्येक शाळांचा परिस्थितीजन्य अभ्यास दि. १ जुलैपासून करण्यात आला होता. ज्यामुळे शाळांच्या गरजा निश्चित करण्यात येतील.

ब. प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती समजून घेण्यासाठी त्यांची मागील वर्षाच्या अध्ययन निष्पत्तींवर आधारित विषयनिहाय पायाभूत चाचणी घेण्यात येणार आहे. यामधून प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीसंबंधी सद्यस्थिती समजून येईल.

क. या दोन्ही अभ्यासांच्या आधारे शाळेचा व प्रत्येक विद्यार्थ्याचा विचार करून प्रत्येक विद्यार्थ्याचा आराखडा मिळून -शाळा गुणवत्ता विकास आराखडा॰ तयार होईल.

२. मा. शिक्षणाधिकारी, मा. DIET प्राचार्य, मा. जिल्हा नोडल अधिकारी, मा. गटशिक्षणाधिकारी, मा. केंद्रप्रमुख, तालुका नोडल अधिकारी यांचेसोबत चर्चा करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक काम करीत आहेत.

३. या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांत मा. मुख्याध्यापक आणि शिक्षकांसोबत आभासी पद्धतीने कार्यक्रमाबद्दल चर्चा करून त्यांची भूमिका विषद केली गेली.

४. शाळा गुणवत्ता विकास आराखडा (SQDP)

School Quality Development Plan (SQDP) हे,

- शालेय गुणवत्ता वाढवण्यासाठी, दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी, मुलांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी
- शाळेची सर्वांगीण विकासासाठी, शैक्षणिक प्रगतीबरोबरच सहशालेय उपक्रमाचा विचार, मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक बाबींच्या विकासाचे ध्येय समोर ठेऊन काम करण्यासाठी परिपूर्ण नियोजन व त्याद्वारे कृती करण्याचे साधन आहे.
- हे शाळांना सक्षम करणारे स्वयंमार्गदर्शक साधन आहे.

५. SQDP विषयी MSTC मार्फत DNO, आदर्श शाळांचे मुख्याध्यापक आणि DTO यांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षक म्हणून ToT प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले.

६. या अनुषंगाने १७ जानेवारी  दरम्यान ऑनलाईन पद्धतीने केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक यांच्या जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्यात आल्या.

७. SQDP प्रक्रियेनंतर जिल्हा स्तरावर संबंधित मुख्याध्यापक,तालुका नोडल अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन अध्यक्ष यांचे २१ डिसेंबर २२ रोजी जिल्हा स्तरावर संबोधन सत्र व शाळा गुणवत्ता विकास आराखडा सादरीकरण कार्यशाळा राबविण्यात आली.

८. जिल्ह्यातील २५ शाळांचे सर्व गुणवत्ता आराखडा बनवून पूर्ण करण्यात आलेले आहेत. सध्या शाळांना SODP तयार करून अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन DNO,DIET आणि tno यांचेमार्फत केले जात आहे.

९. DIET, DNO आणि DTO व्दारे खान अ‍ॅकॅडमीचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. या दरम्यान जिल्ह्यातील १६ शाळांतील सर्व शिक्षकांनी मुलांची खाते उघडून जोडणी पूर्ण केली आहे.

१०. ७नोव्हेंबर २०२३ल येथील गार्डन येथे जिल्ह्यातील आदर्श शाळेचे मुख्याध्यापक एक शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षअसे ६५ यांची शाळा भेटी नंतर चर्चासत्र घेण्यात आले

**नियोजन:**

१. शाळा गुणवत्ता विकास आराखडा एकत्रित करून आणि अंमलबजावणी प्रक्रिया सुरु करणे.
२. मा. आयुक्त, शिक्षण साहेबांच्या सूचनेनुसार तालुका नोडल अधिकाऱ्यांना(TNO) सबंधित शाळा भेटीचे नियोजन करून कार्यवाहीसाठी सूचित करणे.

३. जिल्हा स्तरावर सर्व सबंधित भागधारकांबरोबर मासिक नियोजन व आढावा बैठका घेणे.

४. जिल्हा समन्वयक (DTO) यांच्या सोबत DNO, गट शिक्षण अधिकारी, केंद्र प्रमुख, TNO यांनी शाळा भेटी नियोजन करणे.

५. परिस्थितीजन्य अभ्यास, मधील शाळानिहाय भौतिक व शैक्षणिक बाबी सामायिक करणे.

# *विशेष उपक्रम*

## १.कला उत्सव

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्थरावरील विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय,नवी दिल्ली यांच्यामार्फत सन २०१५-१६ पासून कला उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश आपला सहभाग नोंदवितात. सन २०२०-२१ मध्ये केंद्र शासनाने कला उत्सवामध्ये ***शास्त्रीय गायन, पारंपारिक गायन, शास्त्रीय संगीत, पारंपारिक लोकसंगीत, शास्त्रीय नृत्य, पारंपारिक लोकनृत्य, द्विमितीय चित्र, त्रिमितीय चित्र/ शिल्प व व खेळणी तयार करणे*** या नऊ कला प्रकारांचा समावेश केलेला होता.त्यामुळे सन २०२०-२१ मध्ये राज्याच्या ९ कला प्रकारांचे ९ संघ राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या online कला उत्सवासाठी १० डिसेंबर २०२० पर्यंत नामनिर्देशित करावयाचे आहेत.राज्याच्या संघनिवडीसाठी वर नमूद कला प्रकारांमध्ये ऑनलाईन स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. कला उत्सवामध्ये राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील ९ वी ते १२ वी मध्ये शिकणारे विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व कला प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांचा वैयक्तिक(SOLO) सहभाग होता.

जिल्हा कला उत्सवाचे २०२३ -२३ मध्ये सातारा जिल्ह्यासाठी ९३ **विद्यार्थीचे** व्हिडीओ जिल्हास्तरीय मूल्यांकनासाठी प्राप्त झाले होते.प्रत्येक कलाप्रकार निहाय २ तज्ञ परीक्षकांची निवडसमिती करून सदर परीक्षणा करण्यात आले. तसेच विभागीय कला उत्सव आयोजन दि :- २२ ते २४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत सातारा , मुंबई व कोल्हापूर विभागीतील विध्यार्थ्यांसाठी **पंडित भीमसेन जोशी,कला दालन,सहकार नगर,पार्वती पायथा,सातारा** येथे आयोजित करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी १०९ अपेक्षित विध्यार्थी-स्पर्धक संख्येपैकी ९५ स्पर्धक उपस्थित होते. तसेच त्यांच्या सोबत शिक्षक/पालक ९५ उपस्थित होते. असे एकूण **१९०** व्यक्ती ३ दिवशीय कला स्पर्धेसाठी उपस्थित होते.

कालावधी- ३ दिवस

उपस्थिती- १९५

**फलनिष्पत्ती-**

१.माध्यमिक व उच्च माध्यमिक स्थरावरील विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर संधी मिळाली.

२. विध्यार्थ्यांना **शास्त्रीय गायन, पारंपारिक गायन, शास्त्रीय संगीत, पारंपारिक लोकसंगीत, शास्त्रीय नृत्य, पारंपारिक लोकनृत्य, द्विमितीय चित्र, त्रिमितीय चित्र/ शिल्प व व खेळणी तयार करणे व भूमिका अभिनय** या १० कलाप्रकारांत सहभाग घेता आला.

३. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विध्यार्थ्यांना विविध कला प्रकारातील कला सादर करण्यासाठी उत्तम व्यासपीठ मिळाले.

## २.BAND स्पर्धा

प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने माध्यमिक व उच्च माध्यमिक विध्यार्थ्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील BAND COMPITITION आयोजित करण्यात येणार आहे. शालेय विध्यार्थ्यांमध्ये एकता,देशाभिमान तसेच कृती,साहस,व प्रेरणा यांचा अनुभव विध्यार्थ्यांना घेण्याची संधी देणे. तसेच विध्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती आणि एकता या भावनांची जागरुकता निर्माण करणे अशा उद्देशाने राष्ट्रीय स्तरावरील BAND स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजन सातारा , औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी करण्यात आले होते. मुंबई,सातारा व कोल्हापूर विभागातील स्पर्धा सातारा येथे **मंगळवार दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी शिवछत्रपती/म्हाळुंगे क्रीडा संकुल,बॉक्सिंग ग्राउंड,बालेवाडी,म्हाळुंगे रोड,सातारा . येथे दुपारी १.०० ते सायं- ६.३०** या वेळेत आयोजित करण्यात आल्या होते. व त्याचे युट्युब लाईव्ह लिंकद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी सातारा विभागात एकूण १२ संघांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी प्रत्यक्ष ८ संघ उपस्थित होते.

विध्यार्थी उपस्थिती -२२५

## ३.भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

१२ ऑगस्ट २०२१ ते १५ ऑरस्ट २०२३ या दरम्यान साजरा करण्यात येत आहे .या अनुषंगाने राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत जिल्हास्तरावर विविध उपक्रमांनी साजरा करण्यात यावा, असे निर्देश प्रस्तुत कार्यालयास देण्यात आलेले आहेत. हा अमृत महोत्सव भारताचा स्वातंत्र्य संग्राम, नाविन्यपूर्ण कल्पना, नवे संकल्प, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती, अंमलबजावणी या बाबींचा विचार करून विविध शैक्षणिक उपक्रमांनी साजरा केला जावा, तसेच जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, छात्राध्यापक, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य, अध्यापकाचार्य, आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी जिल्हास्तरावर आयोजित या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, **असे आवाहन ही राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**

**मार्गदर्शक सूचना-**

१. आजादी का अमृत महोत्सव या अंतर्गत संबधित आपल्या अधिनस्थ असणाऱ्या सर्व शाळा/अध्यापक विद्यालये यांनी आपल्या स्तरावर उपरोक्त स्पर्धांचे नियोजन करावे. जानेवारी २०२२ अखेर या स्पर्धा घेवून संबंधित शाळा /अध्यापक विद्यालये यांनी खालील लिंक वर जाऊन जानेवारी २०२२ या महिन्याचा अहवाल दि.२९ जानेवारी पूर्वी सादर करावा.

   https://forms.gle/cQ६TM२HAJV९fja३DA

२. प्रत्येक महिन्यातून प्रत्येक शाळा /अध्यापक विद्यालय मधून एकच अहवाल उपरोक्त लिंकवर सादर केला जाईल, याची शाळा/अध्यापक विद्यालय यांनी दक्षता घ्यावी.

३. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत आपल्याला ऑगस्ट २०२३ पर्यंत प्रत्येक महिन्याला एक स्पर्धा शाळा/अध्यापक विद्यालय यामध्ये घ्यायची आहे. त्यादृष्टीने ऑगस्ट २०२३ पर्यंतचे विविध स्पर्धा व उपक्रम यांचे वेळापत्रक दरमहा आपणास पाठविले जाईल.

४. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अंतर्गत उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद उपलब्ध नाही,हे विचारात घेऊन Non budgetary activities चा समावेश करण्यात आला आहे,याची नोंद घ्यावी.त्यामुळे खर्चिक उपक्रमांचा समावेश करण्यात येवू नये .

५. ज्या स्पर्धा या अंतर्गत राबवल्या जातील ,त्या स्पर्धेतील विजेत्यांना Diet व BRC मार्फत डिजिटल प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येईल .

६. सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळा या स्पर्धा व उपक्रमात सहभाग घेऊ शकतात.

७. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या स्पर्धा व उपक्रमांची समाजमाध्यम याद्वारे जसे facebook, twitter,Instragram,whats app याद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करण्यात यावी .या पोस्टची लिंक अहवाल लेखन व लिंक मध्ये नमूद करावी .

८. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव याअंतर्गत जिल्हा स्तरावर उपक्रमाचे आयोजन,नियोजन,अंमलबजावणी केली जाईल.

९. प्रशासकीय समन्वयक म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक ),प्रशासकीय अधिकारी सातारा मनपा,प्रशासन अधिकारी पिं. चिं. मनपा व प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांची महत्वाची जबाबदारी असेल.

## ४.जिल्हा  भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धा:-

राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प मान्य कृती आराखडा सन २०२३ -२३ नुसार लोकसंख्या शिक्षण विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासंदर्भात कळविले आहे.त्यानुसार जिल्हा,विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर **“लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धा”** घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. संदर्भ क्रमांक १ नुसार शाळास्तर,तालुकास्तर स्पर्धा आयोजित करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार तालुका स्तरावरील दोन्ही स्पर्धेतील केवळ प्रथम क्रमांक **जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी** सोमवार  दिनांक- २१/१०/२०२३   रोजी **राजीव गांधी ई लर्निंग स्कूल सहकार नगर,सातारा येथे सकाळी १०.३० ते ५** या वेळेत आयोजित करण्यात आले होते.सदर स्पर्धेसाठी भूमिकाभिनय चे ७ संघ व लोकनृत्यासाठी ३ संघ समाविष्ट झाले होते.

सहभागी - ६० विध्यार्थी

## ५.क्षेत्र भेट

शाळातून चालणाऱ्या अभ्यास व अभ्यासपूरक उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होत असतात .असे उपक्रम व अभ्यास विषयक दृष्टीकोन विकसित होण्यासाठी शिक्षकांना समुपदेशन ,नाविन्यपूर्ण प्रयोग ,बदलते दृष्टीकोन याबाबत मार्गदर्शनाची आवश्यकता असे याकरिता CRG ,CRC ,BRC /URC, DIET द्वारे मदत ,आधार उपलब्ध करून दिला जातो .त्यामुळे विविध शैक्षणिक प्रवाहाबाबत ,शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षकांना ज्ञान ,माहिती ,कौशल्ये प्राप्त होण्यास मदत होते .काही विषयांबाबत निरिक्षण करण्याचीही संधी शिक्षकांना मिळते .दैनंदिन कामकाज करत असतानाच या बाबी onsite support केल्याने शिक्षकांसाठी उपलब्ध होतात .यातून शिक्षकांचा अध्यापनाबाबत दृष्टीकोन विकसित होतो .त्याचा प्रभाव शिक्षकांच्या दैनंदिन अध्ययन अध्यापन कार्यात दिसून येतो.परिणामी विद्यार्थ्यंचे व शिक्षकांचे व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी onsite support/क्षेत्र भेटी चा उपयोग होतो.

**उद्देश**

क्षेत्रीय अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात शाळा ,प्रशिक्षणे यांना गुणवत्ता वाढीसाठी भेटी देत असतात.प्रत्यक्ष भेटीतून गुंवात्तेसंदर्भात सुरु असलेल्या विविध उपक्रमाची माहिती घेता येते व प्रत्यक्ष निरिक्षण नोंदविता येतात.कार्यक्षेत्रातील शाळा भेटी ,दरमहा होत असलेल्या केंद्र शिक्षण परिषद भेटी ,विविध प्रशिक्षण स्थळांना भेटी तसेच अनुषंगिक कार्यालयीन कामकाजास्तव अध्यापक विद्यालय यांना भेटी या सर्व क्षेत्रभेटी मध्ये येतात .क्षेत्रभेटीत मी काय पाहिले ? भेटी दरम्यान काय दिसले ?मी काय निरिक्षण केले? मला किती व कोणते प्रश्न पडले ?त्यापैकी कोणत्या प्रश्नांची उत्तरे सहज सापडली ?टी योग्य आहेत हे कसे ठरविले ?तसेच कोणत्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अजून प्रयत्न करावा लागेल ?तसेच क्ष प्रकारचे प्रयत्न करणार ?कधीपर्यंत करणार ?या सर्व प्रश्नांची सर्व उत्तरे आपल्याला शोधावी लागतात व तसे नियोजनात बदल करावे लागतात . सातारा जिल्ह्यात ग्रामीण भागात ११ तालुके व नगरपालिका सातारा मध्ये या कार्यालयातील अधिकारी , तसेच सर्व साधन व्यक्ती यांनी सन २०२३ -२३ मध्ये खालीलप्रमाणे भेटी दिलेल्या आहेत.




Path to peace, politness and purity.
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण





सातारा जिल्हा परिषद
ANAND


attempt to


महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे,राज्य विज्ञान संस्था,नागपूर
सातारा जिल्हा परिषद,सातारा शिक्षण विभाग आयोजित
५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२३-२४


आजचे शिक्षण उद्याचे भविष्य




भाषा साक्षरता - जिल्हा सातारा
100.00
80.00
60.00
40.00
20.00
0.00
49.54
77.92
33.36
79.34
33.57
74.02
पहिली
दुसरी
तिसरी
भाषा साक्षरता टप्पा - १
भाषा साक्षरता टप्पा - २